सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २४ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

उबाठाचे ४ आमदार, ३ खासदार, काँग्रेसचे ५ आमदार शिंदे गटात प्रवेश करणार : उदय सामंत

मुंबई, २३ जानेवारी : शिवसेना ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार, १० माजी आमदार आणि काँग्रेसचे ५ आमदार लवकरच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करतील, असा दावा शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. याचा पहिला टप्पा उद्या पार पडणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

सामंत म्हणाले की, मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सलग तीन वेळा दावोसला जाण्याची संधी दिली. त्याचाच भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात एवढी मोठी गुंतवणूक येत आहे. मात्र, मी दोन दिवसांपूर्वी सांगितलं होतं की, काही नेते बालिश झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता न बोलले बरं, मी त्यांच्याबाबत नंतर सविस्तर बोलणार आहे. ज्यांचा राजकीय अस्त झाला आहे ते आता त्यांचा राजकीय 'उदय' करण्यासाठी माझ्या नावाचा उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे हा माझा मोठेपणा आहे. पण अशा कोणत्याही बालिश विधानामुळे माझ्यात आणि

एकनाथ शिंदे यांच्यात दरी निर्माण होणार नाही. मी आधीही सांगितलं होतं की एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात उद्यापासून ठाकरे गटाला खिंडार पडण्यास सुरुवात होईल. याचा पहिला ट्रेलर उद्या (२४ जानेवारी) तुम्हाला पाहायला मिळेल. ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार, काँग्रेसचे ५ आमदार आणि ठाकरे गटाचे १० माजी आमदार व असंख्य जिल्हाप्रमुख हे एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेमध्ये सामील होतील. याचा पहिला टप्पा म्हणून उद्या रत्नागिरीत पहिला पक्ष प्रवेश होणार आहे, असेही सामंत म्हणाले.

रत्नागिरीतील काही माजी आमदार हे ठाकरे गटाला सोडून शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार आहेत. त्यानंतर मी कोल्हापूरमार्गे सांगलीत जाणार आहे. पुढे सातारा आणि साताऱ्यानंतर पुणे असा पहिला टप्पा आहे. माझ्या नावाची बदनामी करणाऱ्यांना माझं आव्हान आहे की त्यांनी आमच्या पक्षात येणाऱ्यांचे पक्ष प्रवेश रोखून दाखवावे. आता तुम्हाला उद्यापासून ठाकरे गटातून दररोज एकजण फुटल्याची बातमी पाहायला मिळेल, असेही सामंत म्हणाले.

राज्य सरकार आणि साखर कारखानदारी एकमेकांच्या साथीने काम करावं लागतं : अजित पवार

पुणे, २३ जानेवारी : वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आज उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे काका तसेच राज्यसभा खासदार शरद पवार एकाच मंचावर आल्याचं पाहायला मिळालं. मात्र आधी मंचावर बाजूबाजूला करण्यात आलेली अजित पवार आणि शरद पवार यांची आसनव्यवस्था अजित पवारांनी स्वत: बदलून घेतली. त्यानंतर अजित पवारांनी आणि शरद पवारांचं भाषण झालं. शरद पवारांनी भाषणामध्ये केलेली सूचना अजित पवारांनी लगेच मान्य केल्याचं चित्र पाहायला मिळालं.

राज्य सरकार आणि साखर कारखानदारी दोघांमध्ये जवळचा संबंध आहे. एकमेकांच्या साथीने काम करावं लागतं, असं अजित पवारांनी आपल्या भाषणामध्ये म्हटलं आहे. गुळाच्या निमित्ताने काहींनी कारखाने काढले. गूळ, गूळ पावडर उत्पादन सुरू केलं. २ हजार, अडीच हजार मेट्रिक टन क्षमतेचे कारखाने काढले. त्यावर बंधनं आणण्याचा विचार करतोय. ऊसाचे क्षेत्र कमी होत असताना कारखाने काढल्यामुळे अडचणी येतात. साखर कारखानदारीत काळानुसार बदल आवश्यक आहे, असं अजित पवारांनी आपल्या भाषणात म्हटलं. साखर कारखान्यांना एकीकडे मदत करायची आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे हे मला पटत नाही. एफआरपी वाढते त्या प्रमाणात एमएसपी वाढत नाही. राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याशी या प्रश्नांबाबत बोलणार आहे. कारखाने चालवताना चुका करू नका. नाहीतर काहीतरी गडबड करायची आणि मग माझ्याकडे येवून दादा आम्हाला वाचवा म्हणायचं. हे चालणार नाही, असा सूचक इशारा अजित पवारांनी कारखानदारांना दिला.

अमेरिकेत नागरिकत्वाच्याआदेशाला भारतीय-अमेरिकन सिनेटर्सचा विरोध

वॉशिंगटन , २३ जानेवारी : अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २० जानेवारी रोजी राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रे हातात घेताच जन्मत: नागरिकत्वावर बंदी घालण्याची घोषणा केली. हा नियम बदलण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकारी आदेशाला आता भारतीय-अमेरिकन सिनेटर्सनी विरोध केला आहे.

भारतीय-अमेरिकन काँग्रेस सदस्य रो खन्ना म्हणाले, नागरिकत्व नियमात बदल केल्याने केवळ बेकायदा व कागदपत्रे नसलेल्या स्थलांतरितांच्या नवजात बाळांवरच परिणाम होणार नाही तर एच-१बी व्हिसावर कायदेशीररीत्या जन्मलेल्यांवरही त्याचा परिणाम होईल. अन्य सदस्य श्री ठाणेदार म्हणाले की, हा देशाचा कायदा आहे आणि राहील. मी कोणत्याही परिस्थितीत त्याचे रक्षण करण्यासाठी लढेन. ट्रम्प यांच्या या आदेशाला इमिग्रेशन हक्क गटांने कोर्टात आव्हान दिले आहे. सध्या अमेरिकेत ४८ लाख भारतीय-अमेरिकन रहिवासी आहेत. यापैकी १६ लाख अमेरिकेत जन्मले आहेत. ट्रम्प यांचे धोरण लागू झाल्यास या लोकांचे नागरिकत्व धोक्यात येऊ शकते. याशिवाय, अमेरिकेत जन्मलेल्या लाखो मुलांचेही अधिकार काढून घेतले जातील. परिणामी, अमेरिकेच्या प्रशासनावर अतिरिक्त भार पडेल.

नवीन जिल्हे निर्मितीचा कुठलाही प्रस्ताव सरकारकडे नाही - बावनकुळे

नागपूर, २३ जानेवारी : सध्या नवीन जिल्हे तयार करण्याचा कुठलाही प्रस्ताव राज्य सरकारकडे आलेला नाही. पुढील जनगणनेनंतर निर्णय होऊ शकतो, परंतु अनेक ठिकाणी नवे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय केले जाऊ शकतात. त्यासंदर्भात चर्चा सुरू आहे. अप्पर जिल्हाधिकारी आणि त्यांच्या कार्यालयाची आस्थापना १०० दिवसांच्या आत उभारण्याचे आमचे प्रयत्न आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते नागपूरात पत्रकारांशी बोलत होते.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात नवीन २१ जिल्हे तयार होणार असल्याची बातमी सोशल मीडियावर जोराने व्हायरल होत आहे. तसेच २६ जानेवारी रोजी नवीन जिल्ह्यांबाबत राज्य सरकारकडून घोषणा करण्यात येणार आहे.

माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, राज्यात कोणतेही नवीन जिल्हे होणार नाही. मात्र जिल्हाधिकाऱ्यांवरचा वाढता ताण कमी करण्यासाठी काही जिल्ह्यात अप्पर जिल्हाधिकारी आणि त्याचे आस्थापना असा प्रस्ताव महसूल विभागाकडे आहे. राज्यात नवीन जिल्हे तयार करण्याचा कुठलाही प्रस्ताव सध्या राज्य सरकारकडे आलेला नाही, मात्र याबाबत पुढील जनगणनेनंतर निर्णय होऊ शकतो. पण अनेक ठिकाणी नवे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय केले जाऊ शकतात. त्यासंदर्भात सध्या चर्चा सुरु आहे. तसेच नागपूर जिल्ह्यातील काटोल, पुणे येथील मावळ आणि बारामती, संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये अप्पर जिल्हाधिकारी आणि त्यांची आस्थापना नेमण्याचा प्रस्ताव १०० दिवसांच्या आत पूर्ण करण्याचा विचार महसूल विभागाकडून करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

अहिल्यानगर दि. २३- भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर होणार आहे.

ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८-३० ते १० वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहणाचा समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८-३० पूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर करावा.ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधुन शिऊन बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी हे राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे जिल्हा प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

स्व. कृष्णाभाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न

खेळामध्ये करिअरच्या संधी उपलब्ध : आ.संग्राम जगताप

स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांनी नेहमीच शहरातील जनतेचे प्रश्न मांडण्याचे काम केले त्यांच्या नावाने गेल्या ४ वर्षापासून क्रिकेट स्पर्धे चे आयोजन करीत खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले गेले असल्यामुळे खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले क्रिकेट खेळामध्ये दिवसेंदिवस बदल होत चालले असून ५० षटकाचा सामना आता २० षटकापर्यंत आला आहे त्यामुळे पारितोषिक देखील वाढले आहे आता खेळाडूंना देखील क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या असल्याचे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

कोणतेही अपयश कायम नसते त्यासाठी जिद्द, चिकाटी मेहनतीची खरी गरज असून प्रयत्नांवर विश्वास ठेवला पाहिजे स्वर्गीय कृष्णा भाऊ हे संघर्षशील नेतृत्व होते त्यांनी निमित्त सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठविला होता खेळाला आता चांगले दिवस आले असून सरकार देखील खेळाडूंचे कौतुक करत मोठ्या प्रमाणात मानधन देत आहे त्याबरोबर खेळाडूला शासकीय नोकरीमध्ये देखील सामावून घेतले जात असल्याची माहिती ॲड. अभय आगरकर यांनी दिली.

जगामध्ये खेळाला खूप महत्त्व आले आहे आपली खो-खो ची टीम जागतिक स्तरावर जाऊन आपल्या देशाचे नावलौकिक केले त्यामुळे आपले भारतीय खेळ जगाच्या पाठीवर गेले आहे आपल्या जीवनामध्ये खेळ हा महत्त्वाचा घटक झाला आहे पालकांनी देखील आपल्या पाल्याला खेळाचे महत्व पटवून दिले पाहिजे त्याच्या आवडीच्या खेळासाठी प्रोत्साहित केले पाहिजे नगर शहराला खेळ संस्कृती लाभली आहे आणि ती वाढवण्यासाठी काम केले पाहिजे असे मत ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर : न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचा अंतिम सामना साई द्वारका क्रिकेट क्लब विरुद्ध रायझिंग स्टार संघामध्ये अटीतटीचा झाला या स्पर्धेमध्ये साई द्वारका क्रिकेट क्लब ने १० षटकामध्ये ११७ धावांचे आव्हान रायझिंग स्टार संघाला १११ धावापर्यंतच मजल मारली आणि साई द्वारका क्रिकेट क्लब ने विजेतेपद पटकावले असून मॅन ऑफ द मॅच अविनाश दातरंगे, मॅन ऑफ द सिरीज हर्षल डोमकावळे, बेस्ट फिल्डर आकाश पिस्का, बेस्ट बॉलर संतोष बनधरे, बेस्ट बॅट्समन विकास गोरे यांना सन्मानित करण्यात आले. ही स्पर्धा २० दिवस सुरू होती या स्पर्धेमध्ये १० टीम सहभागी झाल्या होत्या आणि साखळी पद्धतीने खेळविण्यात आली असून या स्पर्धेमध्ये सुमारे १६० खेळाडू सहभागी झाले असल्याची माहिती साई द्वारका सेवा ट्रस्टचे अध्यक्ष ड.धनंजय जाधव यांनी दिली

स्वर्गीय कृष्णा भाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर ॲड. विश्वासराव आठरे पाटील, साई द्वारकासेवा ट्रस्टचे अध्यक्ष एडवोकेट धनंजय जाधव, माजी नगरसेवक निखिल वारे, राजेंद्र बलदोटा, राजू मामा जाधव, चैतन्य जाधव, दत्ता गाडळकर, पंडित वाघमारे, राजेंद्र बोगा, जितेंद्र लांडगे,आनंद पुंड, राजेंद्र गुगळे, रिकी बक्षी, प्रताप काळे, मितेश शहा, सागर फुलसौदर, छगन मोहिते,राहुल मुथा, सोमनाथ जाधव, आयोजक साई क्रिकेट क्लबचे गणेश गायकवाड, सनी दातरंगे, पंकज सावंत, राज कोंडके, गणेश भिसे, सर्वेश देशमुख, सौरभ येणारे, गौतम गायकवाड आदी उपस्थित होते.

ओला-उबेरला सीसीपीएने बजावली नोटीस एकाच मार्गावरील भाड्याच्या दरात तफावत

नवी दिल्ली, २३ जानेवारी : कॅब सेवा देणाऱ्या ओला आणि उबेर यांच्या भाड्यातील तफावतीसंदर्भात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाने (सीसीपीए) दोन्ही कंपन्यांना नोटीस बजावली आहे. आयफोन आणि ऍन्ड्रॉईड सारख्या वेगवेगळे स्मार्टफोन वापरताना त्यांना एकाच भाड्यासाठी विविध भाडेदर दाखवले जात असल्याची तक्रार ग्राहकांकडून आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ट्विटरवर (एक्स) ही माहिती दिली.

यासंदर्भात जोशींनी सांगितले की, ग्राहक व्यवहार विभागाने या समस्येची दखल घेतली असून सीसीपीएला चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. काही फोन मॉडेल्सवर भाडे जास्त दाखवले जाते तर काहींवर कमी भाडे दाखवले जाते, असे तक्रारदारांनी सांगितले. ओला आणि उबेरला आता त्यांची भाडे निश्चित करण्याची प्रक्रिया आणि या फरकांची कारणे स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

तंत्रज्ञानाशी संबंधित तक्रारीवर सीसीपीएने हस्तक्षेप करण्याची ही पहिलीच वेळ नाही. अलीकडेच सीसीपीएने पलला देखील नोटीसही बजावली होती. नॅशनल कंझ्युमर हेल्पलाइनवर आलेल्या तक्रारींमध्ये, ग्राहकांनी म्हटले होते की, आयओएस १८ किंवा नंतरचे अपडेट केल्यानंतर, त्यांच्या आयफोनला परफॉर्मन्सशी संबंधित समस्या येत आहेत. सीसीपीएने या प्रकरणाची चौकशी करून पलकडून प्रतिक्रिया मागितली आहे. सरकारचा हा उपक्रम डिजिटल प्लॅटफॉर्म आणि तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये न्याय्य व्यवहार सुनिश्चित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे. सीसीपीएची ही कारवाई ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचा विश्वास दृढ करण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे.

राज्य सरकार आणि साखर कारखानदारी एकमेकांच्या साथीने काम करावं लागतं : अजित पवार

पुणे, २३ जानेवारी : वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आज उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे काका तसेच राज्यसभा खासदार शरद पवार एकाच मंचावर आल्याचं पाहायला मिळालं. मात्र आधी मंचावर बाजूबाजूला करण्यात आलेली अजित पवार आणि शरद पवार यांची आसनव्यवस्था अजित पवारांनी स्वत: बदलून घेतली. त्यानंतर अजित पवारांनी आणि शरद पवारांचं भाषण झालं. शरद पवारांनी भाषणामध्ये केलेली सूचना अजित पवारांनी लगेच मान्य केल्याचं चित्र पाहायला मिळालं.

राज्य सरकार आणि साखर कारखानदारी दोघांमध्ये जवळचा संबंध आहे. एकमेकांच्या साथीने काम करावं लागतं, असं अजित पवारांनी आपल्या भाषणामध्ये म्हटलं आहे. गुळाच्या निमित्ताने काहींनी कारखाने काढले. गूळ, गूळ पावडर उत्पादन सुरू केलं. २ हजार, अडीच हजार मेट्रिक टन क्षमतेचे कारखाने काढले. त्यावर बंधनं आणण्याचा विचार करतोय. ऊसाचे क्षेत्र कमी होत असताना कारखाने काढल्यामुळे अडचणी येतात. साखर कारखानदारीत काळानुसार बदल आवश्यक आहे, असं अजित पवारांनी आपल्या भाषणात म्हटलं. साखर कारखान्यांना एकीकडे मदत करायची आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे हे मला पटत नाही.

प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख करणार पुष्पवृष्टी

नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या राजधानीतील कर्तव्यपथावरील मुख्य सोहळयात महाराष्ट्राची कन्या फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजारोहणानंतर ध्वजावर पुष्पवृष्टी करणार. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यामधील देवडी गावची दामिनी दिलीप देशमुख वायुदलात फ्लाईंग ऑफिसर म्हणुन कार्यरत असून राजधानी दिल्लीतील कर्तव्य पथावर होणाऱ्या मुख्य सोहळयात 'परेड कमांडर' म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे.

दामिनीचे वडील न्यायधीश दिलीप देशमुख हे पुणे विभागाचे

माजी धर्मादाय आयुक्त कमिशनर असून त्यांचा कुटुंबियांचा सामाजिक आणि शैक्षणिक वारसा दामिनीने आपल्या मेहनतीने पुढे नेला आहे. वर्ष २०१९ मध्ये देशपातळीवरील कॉमन ऍडमिनिस्ट्रेटिव्ह परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर पद मिळवले. दामिनी अश्वारोहन, कराटे, योगा, रायफल शूटिंग, तसेच खो-खो आणि व्हॉलीबॉलमध्येही प्राविण्य मिळवली आहे. ती कराटेमध्ये ब्लॅक बेल्टची सुवर्णपदक विजेती आहे.

ध्वजारोहण दरम्यान पुष्पवृष्टी

२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी राष्ट्रपती ध्वजारोहण करतील त्यावेळी ध्वजाला मानवंदना देण्यासाठी विमानातून पुष्पवृष्टी करण्याची जबाबदारी फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख यांना सोपविली आहे.

महाविद्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरुन आत्महत्या

आंध्र प्रदेश : आंध्र प्रदेशमधील नारायण महाविद्यालयात प्रथम वर्षाला शिकत असलेल्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली. विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली. सीसीटीव्ही फूटेजमध्ये विद्यार्थी शांतपणे वर्गातून बाहेर येताना आणि तिसऱ्या मजल्याच्या बाल्कनीतून उडी मारताना दिसत आहे. ही धक्कादायक घटना महाविद्यालयात सकाळच्या सत्रात घडली.

विद्यार्थ्याने तिसऱ्या मजल्याच्या बाल्कनीच्या कठड्यावर उभे राहून थेट खाली उडी मारली. वर्ग सुरू असताना विद्यार्थी शांतपणे वर्गातून बाहेर आला. त्याने कोणाला लक्षात येण्याआधीच आत्महत्या केली. वर्गात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात विद्यार्थ्याच्या हालचाली रेकॉर्ड झाल्या आहेत. यात विद्यार्थी वर्गातून बाहेर येताना स्पष्ट दिसत आहे.

महाविद्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारल्यामुळे विद्यार्थी जमिनीवर आदळला तेव्हा मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकून अनेकजण बाल्कनीत आले. यात विद्यार्थी ज्या वर्गात होता त्या वर्गातले विद्यार्थी पण होते. विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल उचलण्यामागचे कारण अद्याप कोणालाही कळलेले नाही. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. महाविद्यालयाच्या प्रशासनाने तिसऱ्या मजल्यावरुन उडी टाकणाऱ्या आणि गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थ्याला तातडीने रुग्णालयात नेले. पण तोपर्यंत वेळ टळून गेली होती. विद्यार्थ्याने थोड्याच वेळात अखेरचा श्वास घेतल.

महाराष्ट्रावर घोंघावतेय बर्ड फ्लूचे संकट! लातूरमध्ये कोंबडीची ४२०० पिल्ले दगावली

मुंबई : राज्यात रायगड पाठोपाठ आता लातूर जिल्ह्यात बर्ड फ्लूच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर एक गंभीर प्रकरण समोर आले आहे. जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्याच्या धालेगाव गावातील एका पोल्ट्री फार्ममध्ये ४२०० पिल्ले मृत्युमुखी पडल्याची माहिती पुढे आलीय. प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. यापूर्वी उदगीर शहरात बर्ड फ्लूमुळे सुमारे ६० कावळ्यांचा मृत्यू झाला होता.

लातूर जिल्ह्यात बर्ड फ्लूच्या वाढत्या धोक्यात एक गंभीर आणि चिंताजनक प्रकरण समोर आले आहे. येथील एका पोल्ट्री फार्ममध्ये ४२०० पिल्लांचा अचानक मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली. ही पिल्ले ५ ते

६ दिवसांची होती आणि २ ते ३ दिवसांतच मरून गेली. यासंदर्भात पशुसंवर्धन आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे म्हणाले की, पोल्ट्री फार्म मालकाने या घटनेची माहिती अधिकाऱ्यांना वेळेवर दिली नाही. प्रशासनाने मृत पिल्लांचे नमुने पुण्यातील राज्य पशु रोग निदान प्रयोगशाळेत पाठवले आहेत आणि तपास सुरू आहे.

यापूर्वी याच जिल्ह्यातील उदगीर शहरात बर्ड फ्लूमुळे ६० कावळ्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर प्रशासन आणि पशुसंवर्धन विभागाने दक्षता वाढवली आहे. अहमदपूर पशुवैद्यकीय रुग्णालयाचे उपायुक्त डॉ. शिवाजी क्षीरसागर यांनी पोल्ट्री फार्म मालकांना त्यांचे फार्म नोंदणीकृत करण्याचे आणि अशा घटनांबद्दल स्थानिक अधिकाऱ्यांना तात्काळ कळवण्याचे आवाहन केले आहे.

पशुसंवर्धन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले, त्यांनी पाहणी केली आणि तपास सुरू केला आहे. जानेवारीच्या सुरुवातीला उदगीर शहरात सुमारे ६० कावळे मृत्युमुखी पडले होते. पुणे येथील प्रादेशिक रोग निदान प्रयोगशाळा आणि भोपाळ येथील आयसीएआर-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसीजेसने या मृत्यूंचे कारण बर्ड फ्लू असल्याचे घोषित केले होते. यापार्श्वभूमीवर कोंबडीच्या पिल्लांच्या मृत्यूमुळे चिंतेत वाढ झाली आहे.

मद्यधुंद ट्रेलर चालकाची ५० वाहनांना धडक!

अंबरनाथ : अंबरनाथमध्ये डोंबिवली- बदलापूर पाईपलाईन मार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. एका मद्यधुंद ट्रेलर चालकाने उलट्या दिशेने गाडी चालवत ५० वाहनांना धडक दिली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरीही काही जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथमध्ये नेवाळी नाक्याकडून बदलापूरच्या दिशेने निघालेल्या भरधाव ट्रेलरने नेवाळी नाक्यावर एका वाहनाला धडक दिली. त्यानंतर पालेगाव, अंबरनाथ आनंदनगर पोलीस चौकी, वैभव हॉटेल चौक, सुदामा हॉटेल चौक असा संपूर्ण रस्ता भरधाव वेगात चुकीच्या बाजूने जात या ट्रेलरने अनेक वाहनांना धडक दिली. यामध्ये पोलिसांच्या गाडीसह कार, दुचाकी, रिक्षांचा समावेश आहे.

या घटनेनंतर पोलिसांसह इतर नागरिक ट्रेलरचा पाठलाग करु लागले. यादरम्यान, ट्रेलर चालकाने अतिवेगामुळे ट्रेलर चालवला आणि हा ट्रेलर रस्त्याच्या कडेला जाऊन उलटला. यावेळी पोलिसांनी या ट्रेलर चालकावर झडप घालत त्याला बेड्या ठोकल्या.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

फारोळा ग्रामपंचायत कार्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि.२३ जानेवारी : पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, विनम्र अभिवादन करण्यात आले, प्रसंगी ग्रामसेविका आशाताईं तुपे, उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे, पल्लवी गोरे, सरला पोपळघट, विष्णू पोपळघट, तमिजाबी पठाण, इलियास पठाण, अशोक गोरे, अहेमद पठाण, रविंद्र गोरे, संदिप चाव्हरे, नारायण धरपळे, अशोक खोतकर तेजस, जाधव दिलीप गोरे, गणेश गायकवाड, संजय धुमाळ, रविंद्र पवार, मंगेश धुमाळ अदि गावकरी आदींची उपस्थित होते.

अनिल शितलकर यांचे निधन

सोयगाव,दि.२३ जानेवारी : सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील प्रगतील शेतकरी अनिल गोविंदा शीतलकर (वय.५२)यांचे गुरुवारी पहाटे १ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान निधन झाले.त्यांच्यावर गुरुवारी दि.२३ सायंकाळी ५ वाजता जरंडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सून व नातू असा परिवार आहे. ते अविनाश शितलकर यांचे वडील होत.

लक्ष्मीबाई महादू शेळके यांचे निधन

कन्नड :- दि.२३ जानेवारी - शहरातील माळीवाडा परिसरातील रहिवाशी लक्ष्मीबाई महादू शेळके यांचे बुधवार २२ जानेवारी रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांच्या पार्थिव देहावर गुरुवार दि. २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता माळीवाडा - बहिरगाव रोडवरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.स्व. लक्ष्मीबाई शेळके या गेल्या अनेक वर्षांपासून कन्नड शहरातील भाजी मंडईत भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत होत्या. त्यांचा पश्चात दोन मुले, दोन मुली सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कन्नड नगरपालिकेचे माजी नगरसेवक स्व. महादू आबळाजी शेळके यांच्या त्या पत्नी, माजी नगरसेविका स्व. मीनाक्षीबाई काशिनाथ शेळके यांच्या त्या जाऊ, माळीवाड्यातील प्रगतशील शेतकरी केशव आणि संजय महादू शेळके यांच्या त्या आई आणि पत्रकार विठ्ठल शिरसे यांच्या त्या चुलतसासु होत.

आयफोनमध्ये ट्रूकॉलर सुरू

मुंबई - अग्रगण्य ग्लोबल कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म ट्रूकॉलरने आयफोनसाठी आतापर्यंतचे सर्वात मोठे अपडेट जाहीर केले आहे. नवीन अपडेट आता सर्वत्र आयफोन वापरकर्त्यांना ट्रूकॉलरच्या स्पॅम आणि स्कॅम ब्लॉकिंग क्षमतांची संपूर्ण शक्ती उपलब्ध करून देते. आता त्यात सर्व प्रकारचे कॉल ओळखण्याची क्षमता आहे. ज्यामुळे हे ट्रूकॉलर त्याच्या अँड्रॉइड आवृत्त्यांच्या बरोबरीचे ठरले. हे ॲपलच्या लाइव्ह कॉलर आयडी लुकअप फ्रेमवर्कद्वारे शक्य झाले आहे, जे विशेषतः ट्रूकॉलरसारख्या ॲप्ससाठी प्रायव्हसी प्रीझर्व्हिंग मार्गाने लाइव्ह कॉलर आयडी उपलब्ध करण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. यामध्ये एपीआय अत्याधुनिक होमोमोर्फिक एन्क्रिप्शन वापर होतो. कॉलर आयडीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात कार्यरत असणारे ट्रूकॉलर हे जगातील पहिले आहे.

५० मेगावॅट डेटा सेंटरसाठी पायाभूत सुविधांचे कंत्राट जीका स्मार्ट इन्स्टॉलेशन सिस्टम्सना मिळाले

पुणे : डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर सोल्यूशन्समधील आघाडीचे नाव असलेल्या जीका स्मार्ट इन्स्टॉलेशन सिस्टम्सना अलीकडेच पुण्यात बांधल्या जाणाऱ्या ५० मेगावॅट क्षमतेच्या डेटा सेंटरसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्याचा करार मिळाला आहे. एका बहुराष्ट्रीय कंपनीने हाती घेतलेला हा प्रकल्प, डेटा-सेंटर पायाभूत सुविधांसाठी मजबूत, स्केलेबल आणि नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करण्यात जीका च्या कौशल्याचे प्रदर्शन करतो. जरी उघड न केलेल्या करारामुळे ग्राहकाचे नाव सार्वजनिक केले जाऊ शकत नसले तरी, या प्रकल्पाचे प्रमाण आणि व्याप्ती डेटा सेंटर उद्योगात जीका ची विश्वासार्हता सिद्ध करते. पुणे हे आधीच अनेक बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांचे केंद्र आहे. नवीन डेटा सेंटरमुळे पुण्याला बहुविध तांत्रिक पायाभूत सुविधांचे केंद्र म्हणून आणखी बळकटी मिळेल. जीका स्मार्ट इन्स्टॉलेशन सिस्टीम्स सर्व्हर हॉलमध्ये हॉट आयल कंटेनमेंट फिटआउट विकसित करेल. ते एकूण अंदाजे १.६ लाख चौरस फूट क्षेत्र व्यापेल. हॉट आयल कंटेनमेंट फिटआउटची रचना, पुरवठा आणि स्थापना ते डेटा सेंटर प्रकल्पाची चाचणी आणि कार्यान्वित करण्यापर्यंत सर्व गोष्टींचे नियोजन, देखरेख आणि अंमलबजावणी जीका करेल.

कीवे इंडियातर्फे के ३०० एसएफ सादर, सादरीकरणाची खास ऑफर

हैदराबाद : कीवे इंडियाने आदिश्वर ऑटो राडइ इंडिया अंतर्गत अत्यंत उत्साहाने आपल्या लोकप्रिय के३०० मोटरसायकल सीरिजची खास एडिशन म्हणजेच कीवे के३०० एसएफ (स्ट्रिट फायटर) सादर करत असल्याची घोषणा केली आहे. सादरीकरणाच्या खास ऑफरचा भाग म्हणून पहिल्या १०० ग्राहकांना ही आकर्षक मोटरसायकल तितक्याच आकर्षक किमतीत म्हणजेच १.६९ लाख (एक्स-शोरूम) या किमतीत खरेदी करता येणार आहे. के३०० एसएफ हा के३००एन चा अपडेटेड प्रकार आहे आणि परफॉर्मन्ससाठी वापरल्या जाणाऱ्या मोटरसायकलच्या चाहत्यांसाठी ही मर्यादित काळाची ऑफर म्हणजे किमतीचे योग्य मूल्य देणारी बाब ठरणार आहे.

सर्वात मोठे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी भारतीय एअरटेल आणि बजाज फायनान्स मध्ये भागिदारी

मुंबई- भारतातील सर्वात मोठी दूरसंचार सेवा पुरवठादार करणा- या भारती एअरटेल आणि देशातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) असलेल्या बजाज फायनान्स यांच्यात भागीदारीची घोषणा नुकतीच करम्यात आली आहे. या घोषणे मुळे वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठे डिजिटल प्लॅटफॉर्म निर्माण होणार आहे तसेच लास्ट माईल डिलिव्हरीमध्ये बदल करण्यासाठी धोरणात्मक अशी ही भागिदारी ठरणार आहे. या भागीदारीमुळे एअरटेलचे ३७० दशलक्ष, १२ लाखाहून अधिक वितरण नेटवर्क आणि बजाज फायनान्सचे २७ उत्पादन लाइन्सचे वैविध्यपूर्ण समूह आणि पाच हजार हून अधिक शाखा आणि ७० हजार फील्ड एजंटांचे वितरण आले आहे. एअरटेल सुरुवातीला बजाज फायनान्सची रिटेल फायनान्शियल प्रॉडक्ट्स ऑफर करणार आहे. ही भागिदारी कोट्यवधी भारतीयांना विविध आर्थिक गरजा असलेल्या पोर्टफोलिओला सक्षम करणार आहे . या सामायिक दृष्टीकोनातून आम्ही या कडे पहात आहोत . आम्ही एअरटेल फायनान्सला समूहासाठी धोरणात्मक मालमत्ता म्हणून तयार करीत आहोत आणि व्यवसायात गुंतवणूक आणि वाढ करत राहू. आज, आमच्यावर १ दशलक्षाहून अधिक ग्राहकांचा विश्वास आहे आणि एअरटेल फायनान्सला आमच्या ग्राहकांच्या सर्व आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी वन-स्टॉप शॉप बनविणे हे आमचे ध्येय आहे- असे भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाल विठ्ठल म्हणाले.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले ३६१ वी पुण्यतिथी सोहळा उत्साहात

समाधीस्थळ, होदेगेरी कर्नाटक येथे शेकडो शिवभक्तांकडून अभिवादन

तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : होदेगेरी, कर्नाटक : स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ३६१ पुण्यतिथी सोहळा, गुरुवार, ता. २३ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाला. समाधीस्थळ, होदेगेरी,कर्नाटक राज्य येथे शेकडो शिवभक्तांकडून शहाजीराजांना अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्यसह कर्नाटक, गुजरात, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व केरळ येथील शिवभक्तांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडला.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांना सर्वप्रथम अभिवादन करण्यात आल्यानंतर कर्नाटक राज्याच्या लोक संस्कृतीतील भारतनाट्याने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. तदनंतर पराक्रम,युध्दप्रसंगाची बुध्दिमत्ता, उत्तम प्रशासन, स्वतंत्र राज्यकारभार या गुणांचे शिवरायांमध्ये बीजारोपण करणारे, अनंत संकटावर मात करत छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणारे स्वराज्य संकल्पक, महाबली,

महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांच्या कार्यकर्तुत्वाचे स्मरण शिवभक्तांकडून यावेळी करण्यात आले.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील येथपर्यंतच असलेली ओळख नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली असली तरीही हा विचार त्यांच्यामध्ये बीजारोपण करणारे शहाजीराजे भोसले होते. स्वधर्माच्या रक्षणासाठी स्वराज्याची स्थापना करण्याचे मनी असतानाही विपरीत परिस्थितीमुळे हे उदात्त कार्य ते करू शकले नाही. मात्र, विपरीत परिस्थितीमुळे घाबरून जाणे हा शहाजीराजे यांचा स्वभाव नव्हता. अनेक शाहींचे ते वतनदार असतानाही स्वधर्माच्या रक्षणासाठी त्यांनी राज्य स्थापन करण्याचे प्रयत्न केले. यात त्यांना अल्पशा यशही आले मात्र छत्रपती शिवरायांच्या मनात हिंदवी स्वराज्याचे बीजारोपण करून त्यांनी संपूर्ण भारत वर्षाला स्वातंत्र्याची पहाट दाखविली, असे मनोगत यावेळी मान्यवरांनी अभिवादन करताना व्यक्त केले.

अखंड भारताला स्वराज्याची पहाट दाखविणारे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची कर्नाटक राज्यातील होदेगेरी येथील समाधीस्थळ उघड्यावर असल्याची मोठी शोकांतिका यावेळी दिसायला मिळाली. महाबली शहाजीराजे यांची समाधीस्थळ उघडयावर असल्याने त्याचा विकास व संवर्धन करण्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी या पवित्र आणि उदत्त कार्यास माझे वैयक्तिकरित्या संपूर्ण सहकार्य राहिल तसेच लवकरात लवकर समाधी स्थळाचा विकास करण्यात येईल,अशी ग्वाही यावेळी दिली.

शिवभक्तांनी महाप्रसाद लाभ घेऊन सोहळ्याचा समारोप करण्यात आला.याप्रसंगी व्यासपीठावर कर्नाटक शिमोगा येथील आमदार शिवगंगाजी, कर्नाटक विधान परिषदेचे आमदार एम.जी. मुळे, उदगीर जिल्हा परिषद सदस्य रमेश अण्णा, शहाजीराजे समाधी ट्रस्ट कर्नाटक सचिव वाय एन रमेशराव, शहाजीराजे समाधी ट्रस्टचे अध्यक्ष मल्लेशजी शिंदे, स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार, वास्तु विशारद महेश साळुंखे, शिल्पकार नरेंद्र सिंग सोळुंके, मच्छिंद्र देवकर पाटील व राजेंद्र लकडे यांच्यासह अनेक मान्यवर आणि शिवभक्तांची उपस्थिती होती.

देशांतर्गत हवाई वाहतुकीत ६ टक्क्यांची वाढ

नवी दिल्ली, २३ जानेवारी : भारताच्या देशांतर्गत मार्गांवरील हवाई प्रवासी वाहतूक २०२४ मध्ये ६.१२ टक्क्यांनी वाढून १६१.३ दशलक्ष झाली. गेल्या वर्षी ही वाहतूक १५२ दशलक्ष होती. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) ही माहिती दिली.

यासंदर्भातील माहितीनुसार डिसेंबर २०२४ मध्ये भारताच्या व्यावसायिक विमान कंपन्यांमध्ये १.४९ कोटींहून अधिक प्रवाशांनी उड्डाण केले. गेल्या वर्षीच्या डिसेंबर २०२३ च्या १.३८ कोटींच्या तुलनेत हे प्रमाण ८.१९ टक्के अधिक आहे. डिसेंबरमध्ये इंडिगोचा मार्केट शेअर ६४.४ टक्के होता. त्याचवेळी एअर इंडियाचा वाटा २६.४ टक्के होता. याशिवाय, आकासा एअर आणि स्पाइसजेटचा वाटा अनुक्रमे ४.६ टक्के आणि ३.३ टक्के होता. डीजीसीएच्या आकडेवारीनुसार, देशांतर्गत हवाई प्रवासी वाहतुकीतील इंडिगोचा वाटा २०२३ मध्ये ६०.५ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ६१.९ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे, या वर्षात एअरलाइनने ९.९९ कोटी देशांतर्गत प्रवासी वाहतूक केली आहे. याच काळात स्पाइसजेटचा बाजारातील हिस्सा ५.५ टक्क्यांवरून ३.७ टक्क्यांवर घसरला.

याकाळात उड्डाण रद्द झाल्यामुळे ६७ हजार ६२२ प्रवाशांना फटका बसला होता. डिसेंबरमध्ये नियोजित देशांतर्गत विमान कंपन्यांचे एकूण उड्डाण रद्द करण्याचा दर १.०७ टक्के होता. उड्डाण रद्द झाल्यामुळे ६७,६२२ प्रवाशांना फटका बसला. उड्डाण विलंबामुळे २.८ लाख प्रवासी प्रभावित झाले होते आणि डिसेंबरमध्ये विमान कंपन्यांनी सुविधेसाठी ३.७८ कोटी रुपये दिले असल्याचेही आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी नागरी विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक आहे देशातील वाढत्या हवाई प्रवासाची मागणी पूर्ण करण्यासाठी एअरलाइन्स त्यांच्या ताफ्याचा तसेच नेटवर्कचा विस्तार करत आहेत, ज्यामुळे भारताला जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नागरी उड्डाण बाजारपेठांपैकी एक बनले आहे. एअर इंडियाकडे ३०० विमाने आहेत. आगामी ३ वर्षांत त्यांच्या ताफ्यात सुमारे ४०० विमाने असतील, असा विश्वास एअरलाइनला आहे.

राज्यातील हवामानात सातत्याने बदल

मुंबई , २३ जानेवारी : राज्यातील हवामानात सध्या चढ-उतार होत आहे.राज्यातील विविध भागांमध्ये तापमानात लक्षणीय बदल होत असून, याचा परिणाम विविध जिल्ह्यांवर होताना दिसत आहे.राज्यातील बहुतांश भागांमध्ये दुपारच्या वेळी तापमानात वाढ होत असतानाच दुसरीकडे रात्री आणि पहाटेच्या वेळी मात्र गारठा वाढत असल्यानं राज्यातून अद्यापही थंडीनं काढता पाय घेतलेला नाही हे दिसून येत आहे.

सातत्यानं सक्रिय असणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांमुळे राज्यात पुन्हा एकदा थंडी काहीशी सक्रिय होताना दिसत आहे. असं असलं तरीही तापमानातील चढ-उतार मात्र कायम असल्याचं पाहायला मिळतंय. पश्चिम महाराष्ट्रासह उत्तर महाराष्ट्रामध्येही धुक्याची चादर पाहायला मिळत आहे. तर, विदर्भात काही अंशी पहाटेच्या वेळी बोचरी थंडी जाणवत असून उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात शुक्रवारनंतर(२४ जानेवारी) तापमानवाढीस सुरुवात होणार आहे. ज्यामुळं पुन्हा एकदा उष्मा वाढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई शहर, उपनगर, औरंगाबाद, पुणे इथं किमान तापमान १४ ते १७ अंशांदरम्यान असलं तरीही कमाल तापमानाचा आकडा सरासरी ३४ अंशांदरम्यान असल्याचं म्हटलं जात आहे.

पैठणला विकास कामाच्या दर्जा बाबत प्रश्नचिन्ह; सा,बां.न.प गाढ झोपेत

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ : पैठण शहरात अनेक विकास कामे होत असून काम करणारी एजन्सी आणि कार्यकर्ते संगनमत करून बोगस काम करत आहेत यातील काही कामांवर निर्माण कार्याला जबाबदार असलेले सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पैठण नगर परिषदचे अभियंता लक्ष देत नसल्याने त्या कामाच्या चांगल्या दर्जा बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरात कोट्यावधींच्या निधी अंतर्गत भरपूर विकास कामे होत असून यातील बहुतांश कामे ही निकृष्ट पध्दतीने होत आहे. यात बोगस कामांना सुध्दा फुगवून दिलेला निधी संशोधनाचा विषय आहे. रातोरात

तयार करण्यात आलेले सिमेंट रोड,नाल्या, पाईपलाईनचे काम दुसऱ्याच दिवशी ढासळत आहे.

संभावित नाट्यगृह इमारती शेजारी करण्यात आलेले सिमेंट रोड तर थेट अभियंत्यांवरच सवाल उपस्थित करत आहे. दृष्ट वापरून निकृष्ट पध्दतीने आथरलेला हा रोड आपली क्वालिटी स्वतःच सांगत आहे. याच पद्धतीने नाथ कॉलनी,भाजी मार्केट,साळीवाडा ते शहागड कमान नारळा,फकीरवाडा,वैदूवाडी ,प्रभाग ३, भवानीनगर,हमालगल्ली,नेहरू चौक परिसर आदी ठिकाणी बोगस कामे केली जात आहे.या कामांवर संबंधित विभागाने वेळीच लक्ष नाही दिल्यास या विभागावरून नागरिकांचा विश्वास नक्कीच उडणार आहे.

आर्थिक सेवांसाठीचा भारतातील सर्वात मोठा डिजिटल प्लॅटफॉर्म लवकरच सुरू होणार

भारती एअरटेल आणि बजाज फायनान्सची या डिजिटल प्लॅटफॉर्मसाठी धोरणात्मक भागीदारी

मुंबई, / संभाजीनगर २० जानेवारी : भारती एअरटेल ही भारतातील सर्वात मोठ्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक कंपनी आहे. तर, बजाज फायनान्स ही देशातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आहे. या दोन्ही कंपन्यांनी वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठा डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटच्या स्तरापर्यंत वित्तीय सेवांचा लाभ पुरवण्यासाठी या कंपन्यांनी ही धोरणात्मक भागीदारी करण्याचे जाहीर केले आहे.

एअरटेलचे ३७ कोटी ग्राहक, १२ लाखांहून अधिकांचा समावेश असलेली मजबूत वितरण व्यवस्था आणि बजाज फायनान्सच्या २७ उत्पादन श्रेणींचे वैविध्यपूर्ण समूह; तसेच त्यांच्या ५ हजारहून अधिक शाखा आणि ७० हजार फील्ड एजंट्सची उपलब्धता या अनोख्या भागीदारीमुळे एकत्र आली आहे.

एअरटेल सुरुवातीला आपल्या एअरटेल थँक्स ॲपवर बजाज फायनान्सची किरकोळ वित्तीय उत्पादने सुलभ व सुरक्षित ग्राहक अनुभवासाठी देऊ करणार आहे आणि नंतर स्टोअर्सच्या देशव्यापी नेटवर्कद्वारे प्रदान करणार आहे. वित्तीय उत्पादने आणि सेवांमध्ये लक्षणीय वाढ करणे कंपन्यांच्या डिजिटल मालमत्तेच्या एकत्रित सामर्थ्यामुळे एअरटेल व बजाज फायनान्सला शक्य होणार आहे.

एअरटेल सुरुवातीला बजाज फायनान्सची किरकोळ वित्तीय उत्पादने आपल्या एअरटेल थँक्स ॲपवर उपलब्ध करून देईल. ज्यामुळे एअरटेलच्या ग्राहकांना सुरक्षितरित्या आणि सहज त्या उत्पादनांचा वापर करता येईल. त्यानंतर ही उत्पादने देशभरातील एअरटेलच्या स्टोअर्सच्या नेटवर्कद्वारे उपलब्ध केली जातील. दोन्ही कंपन्यांच्या डिजिटल संसाधनांची एकत्रित ताकद एअरटेल आणि बजाज फायनान्सला वित्तीय उत्पादने आणि सेवांचा प्रसार करण्यासाठी मजबूत करेल.

भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाल वित्तल म्हणाले की, एअरटेल आणि बजाज फायनान्स या देशातील दोन विश्वासार्ह

डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे वित्तीय सेवा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचवण्यासाठी ही अनोखी भागीदारी आकाराला आली

एअरटेल आपल्या सर्व ३७ कोटी ग्राहकांपर्यंत बजाज फायनान्सच्या किरकोळ वित्तीय सेवांच्या ऑफर्स देऊ करणार आहे. या भागीदारीमुळे एअरटेलच्या प्रभावी डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर आणि इतर माध्यमांवर बजाज फायनान्सच्या विविध श्रेणींमधल्या २७ उत्पादनांना स्थान मिळणार. कर्ज मूल्यांकनाची क्षमता तपासणीसह ए-आय आधारित ही उत्पादने असणार.

कंपन्या आहेत. कोट्यवधी भारतीयांना विविध प्रकारच्या आर्थिक गरजा असलेला पोर्टफोलिओ देऊन सबल करण्याचा दृष्टीकोन त्यांनी ठेवलेला आहे. दोन्ही कंपन्यांचा आवाका आणि मजबूत वितरण व्यवस्था या भागीदारीचा पाया म्हणून काम करणार आहे. यामुळे आम्हाला बाजारपेठेत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून चांगले यश प्राप्त करण्यात मदत होईल. आम्ही एअरटेल फायनान्सला समूहातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणून पुढे आणत आहोत आणि यामुळे आम्ही त्यातल्या व्यवसायात गुंतवणूक आणि वाढ करत राहू. सध्या, आमच्यावर १० लाखांहून अधिक ग्राहकांनी विश्वास ठेवला आहे. आमच्या ग्राहकांच्या सर्व आर्थिक गरजांसाठी एअरटेल फायनान्स हाच एकमेव पर्याय म्हणून पुढे आणणे हे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे.

बजाज फायनान्सचे व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन म्हणाले, डेटावर आधारित कर्ज मूल्यांकन आणि अर्थ क्षेत्राचा समावेश याच्या केंद्रस्थानी भारताची डिजिटल प्रणाली कार्यरत राहिली आहे. आमची एअरटेलसोबतची भागीदारी भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांचा वापर करतेच; मात्र त्याचबरोबर भारतातील दोन आघाडीच्या आणि सर्वात विश्वासार्ह ब्रँड्सचे कौशल्य आणि त्यांचा आवाका यांचाही मेळ साधते. एअरटेल सोबत एकत्र काम करून आम्ही भारताचा पहिल्या पसंतीचा वित्त पुरवठादार बनू इच्छितो. तसेच दुर्गम भागातही लाखो लोकांना या वित्तीय सेवांचा लाभ घेण्यास समर्थ बनवणे हे देखील आमचे स्वप्न आहे. बजाज फायनान्स एकीकडे एआयच्या वापराने कार्यक्षमता वाढवत ग्राहकांना संतुष्ट करत आहे. तर दुसरीकडे या स्थितीत एअरटेलशी हातमिळवणी करण्यासही उत्सुक झाली आहे.

आतापर्यंत बजाज फायनान्सची दोन उत्पादने एअरटेल थँक्स पवर प्रायोगिकरित्या उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मार्चपर्यंत बजाज फायनान्सची आणखी चार उत्पादने एअरटेल थँक्स पवर ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येतील. यामध्ये गोल्ड लोन, बिझनेस लोन, को-ब्रँडेड इन्स्टा ईएमआय कार्ड आणि पर्सनल लोनचा समावेश आहे. बजाज फायनान्सची जवळपास १० आर्थिक उत्पादने या कॅलेंडर वर्षात एअरटेलद्वारे हळूहळू उपलब्ध करून दिली जातील. एअरटेलच्या ग्राहकांना एअरटेल थँक्स ॲपद्वारे, एअरटेल-बजाज फिनसर्व्ह इंस्टा एचख कार्डसाठी अर्ज करण्याची संधी मिळेल. त्यानंतर देशभरातील एअरटेल स्टोअर्सच्या नेटवर्कद्वारेही या कार्डसाठी ग्राहकांना मागणी नोंदवता येईल.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २३ जानेवारी : बिडकीन येथील स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी ह.भ.प.अमोल महाराज भवर, आनंदा ठाणगे यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी लोकनेते विनायकराव मेटे सहकारी सुत गिरणी अध्यक्ष विजय शेजुळ , स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था सचिव सचिन हाडे , लहु कातबने, ज्ञानेश्वर औटी , रामेश्वर कुऱ्हाळ, धनंजय औटी, पुजा कोठाळे आदी उपस्थित होते दरम्यान महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त वाहतूक नियंत्रक माणिक आष्टीकर , कर्मचारी व नागरिकांकडून बिडकीन बसस्थानक परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने सोयगाव बसस्थानक येथे स्वच्छता मोहीम संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ जानेवारी : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्ताने सोयगाव बसस्थानक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.याप्रसंगी नॅशनल मराठी हायस्कुल सोयगाव विद्यार्थी व शिक्षक वृंद यांनी सामाजिक कार्यात सहभाग म्हणून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.यावेळी नॅशनल हायस्कूल सोयगावचे मुख्याध्यापक अमजद पठाण,शिक्षक पोपराव साखळे,सोयगाव आगाराचे आगार प्रमुख मनिष जवळेकर,स्थानक प्रमुख सतीश अंभोरे,वाहतूक नियंत्रक वर्जन जाधव,वाहतूक नियंत्रक राजू बावस्कर,वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर,वरिष्ठ लिपिक सतीश पाटील,वाहक जयराम सूर्यवंशी,वाहक आशोक तायडे,वाघ,वाहक संतोष पाखरे,वाहक आन्ना ढेपले,चालक वाहक समाधान जाधव,शिपाई मधुकर आमटे सह यांत्रिक,पर्यवेक्षक कर्मचारी,लिपिक,चालक,वाहक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आगार प्रमुख मनिष जवळेकर यांनी वर्षभर स्वच्छ्ता ठेवण्याचे आवाहन करत विभागात सोयगाव बसस्थानकाला पारितोषिक कसे मिळवता येईल याकरीता प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगितले.

छत्रपती संभाजी नगर लोककला महोत्सव गुणगौरव सोहळा संपन्न

तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : राष्ट्रवादी भवन नवजीवन कॉलनी एन हडको छत्रपती संभाजी नगर येथे राज्यभरातून वेगवेगळ्या जिल्ह्यातून शाहीर ,कवी ,गायक ,भजन, भारुड ,भीमगीत ,पथक ,लोककला पथक ,लोकनाट्य ,तमाशा मंडळ ,पोतराज ,आराधी ,गोंधळ ,जागरण ,वासुदेव ,लोकगीत ,भावगीत ,कव्वाली ,विविध प्रकारच्या लोककला व सादरीकरण प्रात्यक्षिक करण्यात आले त्यात खुलताबाद तालुक्यातील घोडेगाव शंकरपूर वाडी व टाकळी रा.रा. भजनी मंडळ वृद्ध कलावंत व कलावंत बबनराव (भाऊ) गोरे संजय जाधव ता .उपाध्यक्ष , टाकळी रा.रा. अंबादास दळे, गिरजाराम जाधव भारत जाधव इत्यादी सर्व पाच कलावंतांनी (भजनी मंडळ) यांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन कला मंचावर गवळण सादर केली.

त्याबद्दल या कलावंतांचा .स.सो .खंडाळकर अध्यक्ष लोककला महोत्सव समन्वय समिती, एकनाथ त्रिभुवन .स्वागताध्यक्ष लोककला महोत्सव समन्वय समिती व शाहीर अशोक जी बागुल या मान्यवरांच्या हस्ते खुलताबाद येथील पाच कलावंत यांचा सन्मानपत्र देऊन कलामंचवर गुणगौरव करण्यात आला.

बिडकीन डी एम आय सी ऑरिक संपादित जमीनी मधील शेतकऱ्यांना पीक काढुन घेण्या बाबत आदेश

बिडकीन दि .२३ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे डीएम आय सी साठी आठ हजार एकर जमीन संपादित करण्यात आली आहे यामध्ये डीएम आय सी ऑरिक करीता संपादन करण्यात आलेल्या जमीनी मधून ८५० एकर जमीन टोयोटा उद्योग समूहास प्रदान करण्यात आलेली आहे, त्यांना प्रदान करण्यात आलेल्या जमीनी दि .२८ जानेवारी पासून उद्योग उभारणीचे काम सुरु करणार आहे, परंतु सदर जमिनीमध्ये शेतकऱ्यांनी या कार्यालयाची परवानगी न घेता पीक पेरणी केलेली आहे,तथापी उद्योग उभारणीचे काम सुरू होत असल्याने सदर जमिनीवरील पीक खराब होऊ शकतो त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांना त्यांनी पेरणी केलेले पीक दि २८ जानेवारी पुर्व काढून घेण्याबाबत आपले स्तरावरुन सुचित करावे जेणेकरून उद्योग उभारणीस व्यत्यय येणार नाही असे पत्र प्रकल्प व्यवस्थापक महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या अरुण डुबे यांनी लेखी स्वरूपात बिडकीन सरपंच व नांदलगाव सरपंच यांना दि .२२ जानेवारी रोजी पत्राद्वारे कळवले आहे.

संचालक माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर, दि.२३, (विमाका) :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील संचालक (माहिती) कार्यालयातील वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची असल्याने वृत्तपत्र रद्दी खरेदीदार यांच्याकडून गुरूवार, दि.३० जानेवारी, २०२५ पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली आहेत. वृत्तपत्र रद्दी पाहणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ५ या वेळेत करता येईल. रद्दी विकत घेऊ इच्छिणाऱ्यांनी संचालक (माहिती) कार्यालय, अरिहंत बिल्डींग, सिटीजन्स हॉटेल समोरील गल्ली, खडकेश्वर, मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर येथे दरपत्रक सादर करावेत, असे आवाहन संचालक (माहिती) कार्यालयातर्फे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३३१०८५ यावर संपर्क साधावा.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर फोन: ०२४३५-२२१०२४

जा.क्र.२०२४/जमा-२./कुळ कावी- ११२ दिनांक १७/१२/२०२४

जाहीर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे नरसिंगपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मोहन काशीनाथ ठाकरे व भागुबाई लक्ष्मण गायकवाड रा कन्नड यांनी मौजे नरसिंगपुर गट क्र ०२ मधील क्षेत्र ०.८७ हे आर जमिनीवरील इतर अधिकारातोल प्रतिबंधीत सत्ता प्रकार सक्षम प्रधिकारी यांच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरण बंदी कुळ कायदयाने प्रात्त जमीन ची नोंद कमी करुन भोगवटादार वर्ग २ चा ७/१२ वर्ग। करणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

तहसिलदार, कन्नड

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मु.नोंद/सी.आर / २०२४
दिनांक : १०/१२/२०२४

जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती विशाल छोटु भगुरे रा. पिपंळगांव दिवशी ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचाय कार्यालय पिपंळगांव दिवशी ता गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे विशाल छोटु भगुरे यांचा जन्म दिनांक २९/०७/२००६ रोजी मौजे पिपंळगांव दिवशी ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचाय कार्यालय पिपंळगांव दिवशी ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक : १०/१२/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

भराडी सोसायटीच्या चेअरमनपदी शिवसेनेचे विष्णू महाजन यांची बिनविरोध निवड

नवनिर्वाचित चेअरमन तसेच संचालकांचा आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते सत्कार

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.२०, भराडी ता. सिल्लोड येथील शेतकरी कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन पदासाठी आज निवड प्रक्रिया पार पडली. चेअरमन पदासाठी शिवसेनेचे विष्णू रामचंद्र महाजन यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने भराडी सोसायटीच्या चेअरमन पदी विष्णू महाजन यांची बिनविरोध निवड झाली. नवनिर्वाचित चेअरमन तसेच उपस्थित संचालकांचा माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधत नवनिर्वाचित चेअरमन व संचालक मंडळाला शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी जि. प. अध्यक्ष श्रीराम पा. महाजन, सहकारी जिनिंग प्रेसिंगचे व्हाईस चेअरमन अनिस खा पठाण, सरपंच पप्पू जगनाडे, उपसरपंच गजानन महाजन, नवनिर्वाचित चेअरमन विष्णू महाजन, व्हाईस चेअरमन राजू सुरे, संचालक कोंडूबा पा.राकडे, सदाशिव पा. खोमणे, कस्तुराबाई महाजन, सुखदेव सुरे, अर्जुन शेळके, मुरलीधर शेजुळ, तसेच प्रकाश महाजन,राहुल महाजन, भाऊसाहेब महाजन, युवराज महाजन, मयूर अग्रवाल, योगेश भिसेन, आरेफ पठाण, सांडू सूरे, शिवराज खोमणे , रवी महाजन आदींची उपस्थिती होती.

एमजीएममध्ये 'मराठी भाषा : रोजगाराच्या संधी' विषयावरील व्याख्यानाचे आयोजन

मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संपादकीय सहाय्यक डॉ.दत्ता घोलप साधणार संवाद

छत्रपती संभाजीनगर, दि.२३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा मराठी भाषा विभाग, एमजीएम रेडिओ ९०.८ एफएम आणि भाषा संचालनालय विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता रुक्मिणी सभागृह येथे 'मराठी भाषा : रोजगाराच्या संधी' या विषयावर मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संपादकीय सहाय्यक डॉ.दत्ता घोलप यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाकडून मंगळवार, दिनांक १४ जानेवारी २०२५ ते मंगळवार, दिनांक २८ जानेवारी २०२५ दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. या उपक्रमांतर्गत '३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रे' घेतली जात आहेत. याचाच भाग म्हणून एमजीएम विद्यापीठात डॉ.घोलप यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. तसेच यावेळी कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ.के. पी.सिंग व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

या व्याख्यानासाठी सर्वांना खुला प्रवेश असणार असून मोठ्या संख्येने विद्यार्थी, विषयतज्ञ, संशोधक, प्राध्यापक व नागरिकांनी यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. राम गायकवाड, प्रा. मारोती गायकवाड व एमजीएम रेडिओचे केंद्रप्रमुख सुनील शिरसिकर यांनी केले आहे.

संघ हीच जीवनगाथा

अलकः- (२२) **देशद्रोही**

एकदा संघाच्या एका बैठकीत डॉक्टरांनी देशद्रोहीची व्याख्या सोदाहरण सांगितली. कारण बरेच जण म्हणाले मुसलमान दंगा करतात म्हणजे ते देशद्रोही आहेत. यावर डॉक्टर तात्काळ म्हणाले मुसलमानांना देशद्रोही म्हणणे साफ चुकीचे आहे. डॉक्टरांच्या या बोलण्याचा उलगडा तेथे बैठकीत असलेल्यांना झाला नाही हे पाहून लगेच त्यांनी स्पष्टीकरण केले. मुसलमानांना देशद्रोही म्हटल्याने हा देश त्यांचा आहे असा अर्थ ध्वनित होतो. त्यांचे चाळे देशविघातक असतील तर ते देशाचे शत्रू आहेत. तसेही ते बाहेरून आलेले आहेत. त्यांनी भारतावर आक्रमण करून आपल्या संस्कृतीला धुळीस मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. असे आक्रमक देशाचे शत्रू असतात. त्यांनी आक्रमकता सोडावी; इथल्या राष्ट्रीय जीवनाशी सुसंवाद करावा. असा सुसंवाद करणारा मुसलमान देशद्रोही नाही हे आम्ही मान्य करू व त्याचे स्वागत करू. त्याच्याशी दोस्ती करू. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

बाळासाहेब ठाकरे यांची ७८वी जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.२३ जानेवारी - शहरातील पिशोर नाका येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी केली आहे.

यावेळी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकण्यात आला शिवसेना माजी आमदार उदयसिंग राजपूत हे अध्यक्षीय स्थानी होते.यावेळी तालुकाप्रमुख संजय मोटे, उपतालुकाप्रमुख नवनाथ राठोड विभाग प्रमुख कल्याण चव्हाण, सतीश जिवरख, उप विभाग प्रमुख अर्जुन पवार,युवा सेना उपजिल्हा प्रमुख भारत मिसाळ, तालुका संघटक रुपालीताई मोहिते,सवितातई मिसाळ, अर्चना झोडगे, निर्मला ताई चौतमल, विकास राजपूत,सुनिल राठोड, भारत आधाने, अक्रम शेख,संजय घुगे, मुकेश चव्हाण, विशवनाथ त्रिभुवन, रामराजे देशमुख,हिंदराज लखवाल, तुकाराम राठोड, गोकुळ चव्हाण, असिफ शेख,सह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

जाहीर प्रगटन

मा दिवाणी न्यायाधिश साहेब, वरीष्ठ स्तर न्यायालय वैजापूर ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

सिविल एम.ए. क २८/२०२५

अर्जदार : १. कांताबाई जगन्नाथ खंडागळे, वय ७६ वर्ष, धंदा-घरकाम व शेती, २. गणेश जगन खंडागळे, वय ३६ वर्ष, धंदा-शेती, ३ विजय जगन खंडागळे, वय ४२ वर्षे धंदा-शेती ४. अनिल जगन्नाथ खंडागळे, वय. ३७ वर्षे, धंदा-शेती, वरील सर्व रा. परसोडा ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : निरक

प्रकरण : बॉम्ब रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत जगन ऊर्फ जगन्नाथ भिका खडागळे यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्याच विधीज्ञ अविनाश चव्हाण याच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार के १ चे पती २ ते ४ चे वडील मयत जगन ऊर्फ जगन्नाथ भिका खंडागळे हे. दि. ०५/०३/२०२४ रोजी परसोडा ता वैजापूर येथे मयत झालेले आहे. मयत जगन ऊर्फ जगन्नाथ भिका खडागळे यांना अर्जदाराशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारास शासकिय, निमशासकीय कामासाठी मृत्यूनतरच्या लाभासाठी हेअरशिप प्रमाणपत्र आवश्यक आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत जगन ऊर्फ जगन्नाथ भिका खंडागळे यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल.

पुढील तारीख १७-२-२५.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
न्यायालय वैजापूर वैजापूर ता. वैजापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर ता गंगापुर जि औरंगाबाद

पुता. ४/३/२०२५

किं एम ए नं ४५/२०२५

अर्जदार : १. प्रकाश विनायक पवार, रा सखारामपंतनगर ता गंगापुर जि औरंगाबाद २. परीगाबाई भ्र भरत गायकवाड, रा समतानगर ता गंगापुर जि औरंगाबाद ३. सावकारणी बालचंद गायकवाड, अहिल्याबाई होळकर नगर ता गंगापुर जि औरंगाबाद ४. लक्ष्मीबाई दत्ता राजपुत, रा रावेर बिंदे वस्ती ता जि पुणे ५. आतन दिंगबर जाधव, सुभिद्रा नगर ता कोपरगाव जि अहमदनगर, ६. मिराबाई भ्र भगवान जाधव, सुभिद्रा नगर ता कोपरगाव जि अहमदनगर, ७. लता भ्र रवी राणे, लक्ष्मी कॉलनी संगमनेर जि अहमदनगर ८. रोशन विनायक पवार, सखारामपंत नगर ता गंगापुर जि औरंगाबाद ९. हिम्मतलाल विनायक पवार, सखारामपंत नगर ता गंगापुर जि औरंगाबाद १०. रेखा संजय पवार सखारामपंत नगर ता गंगापुर जि औरंगाबाद

विरुध्द निरंक

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार कं १ ते १० यांनी मा न्यायालयात दि.कि.अर्ज के ४५/२०२५ प्रकाष वि. निरक असे प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केले असुन मयत ताराबाई भ्र विनायक पवार यांचे दिनांक १.१०.२०२४ रोजी सखाराम पंत नगर ता गंगापुर येथे अल्पषा आजाराने निधन झाले असुन त्यांचे एकमेव अर्जदार हे सर्व कायदेषीर वारसदार आहेत.

त्याच प्रमाणे अर्जदार के १ ते ९ यांचे मयत ताराबाई विनायक पवार हि आई असुन अर्जदार कं १० यांची सासु आहे. मयत ताराबाई विनायक पवार यांचे नावे वैजापुर मर्चट बैंक षाखा गंगापुर मध्ये जमा असलेली रक्कम रु एक लाख पंच्याहत्तर हजार रूपये ज्याचा खाते के ०००३००६९०००००००२०१० असा असुन त्यावरील जमा रक्कम अर्जदार के १ ते १० यांना मिळण्यासाठी अर्जदार यांनी सदर अर्ज दाखल केला आहे. मयत ताराबाई पवार यांना यांच्या षिवाय अर्जदार यांच्या व्यतीरीक्त कोणीही कायदेषीर वारस नाहीत. तरी कोणालाही काही आक्षेप उजर असल्यास ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत ताराबाई विनायक पवार यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर येणा-या आक्षेपास ग्राहय धरल्या जाणार नाही करीता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यासह दिले आहे.

दिनांक २३.१.२०२५

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

मा. दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात

दि. की. अर्ज क्र. ३२२/२०२४

पुढीलतारिख २८/०२/२०२५

अर्जदार : १) श्री बिसन पिता छगन जाधव वय ८० वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद २) श्री त्रिंबक पिता छगन जाधव वय ७८ वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३) श्री काळू पिता छगन जाधव वय ५५ वर्षे, धंदा-शेती, रा. जैतखेडातांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) सौ. कलीबाई भ्र. नागदेव राठोड वय ७६ वर्षे धंदा शेती, रा. कोळंबीवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५) सी. कालीबाई भ्र. त्रिंबक चव्हाण वय ४५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. हिवरखेडा गौताळा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फेः जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं १ ते ३ हे मयताचे मुले आसुन अर्जदार क्रं ४ ते ५ मयताचे मुली आहेत, गयत नामे छगन मन्साराम जाधव हे अर्जदार क्रं. १ ते ५ चे वडिल होते ते दिनांक २३/०५/२०१९ रोजी वृधापकाळाने जैतखेडा तांडा येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार कं. १ते ५ हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांकः १३/१/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क. ५० / २०२५ निशाणी

अर्जदार : १) अनुसयाबाई आसाराम कानडे, वय ८० वर्ष, धंदा घरकाम, रा. पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) आप्पासाहेब आसाराम कानडे, वय ६३ वर्ष, धंदा शेती, रा. पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) आण्णासाहेब आसाराम कानडे, वय ६० वर्ष, धंदा शेती, रा. पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) विष्णु आसाराम कानडे, वय ४७ वर्ष, धंदा शेती, रा. पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) सुखदेव आसाराम कानडे, वय ४४ वर्ष, धंदा शेती, रा. पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) कौसल्या बाबासाहेब प्रधान, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. औरंगाबाद ७) चंद्रकला ज्ञानेश्वर बाराहाते, वय ५७ वर्ष, धंदा घरकाम, रा. पिंप्री पो. शिंगी ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस.के. अंबेकर गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ७ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी रहिवासी असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ७ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क २ ते ७ हे आपसात सख्खे भाउ व बहिन आहेत. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ७ यांचे वडील नामे आसाराम यशवंता कानाडे हे दि. ०५/०८/२०२४ रोजी मौजे पळसगांव पो. घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ ते ७ हे मुले व मुली कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर वारसदार नाही. मयत आसाराम यशवंता कानाडे यांना अर्जदार क १ ते ७ हे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत आसाराम यशवंता कानाडे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच तहसिल, तलाठी व ग्रामपंचायत इत्यादी शासकीय कार्यालयामध्ये कार्यवाहीसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन - अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. २०/१/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.४७/२०२५

अर्जदार : १) शहणाजबी भ्र. हवीब शेख, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) वसिम पि. हबीब शेख, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) साजिद पि. हबीब शेख, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) शबाना भ्र. जावेद पठाण, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. खंडाळा ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) रिजवाना भ्र. रशिद शेख, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. नगरसुल ता. येवला जि. नाशिक

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.वी. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व वहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे हबीब अजिमोद्दीन शेख हे मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २७/०५/२०२४ रोजी मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत हवीव अजिमोद्दीन शेख यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याने मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक २१/२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक २३/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र.५७७/२०२४

अर्जदार : १) लक्ष्मण पुंजावा सोनवणे, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुरजि. छत्रपती संभाजीनगर २) सुनिल पुंजाबा सोनवणे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) ताराबाई भ्र. बाळु जाधव, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम रा. शिल्लेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) वैशाली भ्र. गणेश सोनवणे वय ३६ वर्षे धंदा घरकाम रा. सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) कावेरी पि. गणेश सोनवणे, वय १४ वर्षे, अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.४ वैशाली.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.३ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.१ ते ३ यांचा मयत भाऊ नामे गणेश पुंजावा सोनवणे यांची विधवा पत्नी असुन अर्जदार क्र.५ ही मुलगी आहे. पुंजाबा भाऊराव सोनवणे मौजे सावंगी, लासुर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०८/०४/२०२३ रोजी मयत झाले आहे व तसेच मयत पुंजावा भाऊराव सोनवणे यांची पत्नी लक्ष्मीबाई पुंजाबा सोनवणे ह्या दिनांक ०४/१०/२००५ रोजी मयत झालेल्या आहे. मयत पुंजाबा व मयत लक्ष्मीबाई यांना तीन मुले नामे अर्जदार क्र.१ लक्ष्मण, अर्जदार क्र.२ सुनिल व गणेश व एक मुलगी ताराबाई असे कायदेशीर वारसदार होते, त्यापैकी गणेश पुंजाबा सोनवणे हा मयत झाला असुन त्यांना अर्जदार क्र.४ ही विधवा पत्नी व अर्जदार क्र.५ ही मुलगी असे वारसदार आहे. येणे प्रमाणे मयत पुंजाबा भाऊराव सोनवणे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक २३/१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्य

अग्रलेख...

गडचिरोलीच्या विकासाला फडणवीसांचे पंख

काँग्रेसच्या कार्यकाळात विदर्भाच्या मागासलेपणाबद्दल सातत्याने चर्चा व्हायची. विदर्भाचा औद्योगिक, शैक्षणिक, कृषी आणि पायाभूत सुविधांचा अनुशेष मोठा असल्याचे नागपूर कराराचे दाखले देऊन स्वतंत्र विदर्भाची मागणी तसेच विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची मागणी करण्याचा आणि या मागणीला सर्वपक्षीय पाठिंबा मिळण्याचा तो काळ होता. विदर्भाला राजकीय प्रतिनिधित्व पुरेशा प्रमाणात नसल्याचेही बोलले जायचे. पण आताशी त्याबद्दल फारसे बोलले जात नाही; त्याला कारणेही आहेत. विदर्भातील अनेक मंत्र्यांना राज्य मंत्रिमंडळात मानाच्या पदावर सामावून घेतले गेले आहे. समृद्धी महामार्गामुळे विदर्भातील कच्चा माल थेट मुंबईपर्यंत पोहोचविण्याची सोय झाली आहे. सोबतच सिंदी ड्रायपोर्टमुळे विदर्भातील उत्पादने थेट भारतातील विविध शहरात वायुवेगाने पोहोचविण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाच्या झंझावातामुळे मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, कोकण किनारपट्टी आणि मराठवाड्याप्रमाणेच विदर्भातही सर्वत्र विकासाची गंगा वाहताना दिसत आहे. फडणवीसांनी कमाल केल्यामुळे गडचिरोलीसारख्या मागास जिल्ह्याचे भाग्य उजळले आहे. येथे नक्षलमुक्तीसोबतच औद्योगिक परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. महाराष्ट्राच्या सुदूर टोकावर असलेल्या गडचिरोलीसारख्या मागास आणि नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वीकारून त्यांनी भविष्यात राज्याचे धोरण ग्रामीण आणि वनवासीबहुल भागाच्या विकासाचे राहणार असल्याचे दाखवून दिले आहे. विदर्भातील सर्वात मागास राज्यातील या शेवटच्या जिल्ह्यात विकासाची गंगा कधी पोहोचलीच नाही. नादुरुस्त रस्ते, आजारी उद्योग, बेरोजगारी, शैक्षणिक पीछेहाट, विविध क्षेत्रात संधींचा अभाव या पाचवीलाच पुजलेल्या येथील समस्या होत्या. आता मात्र गडचिरोली जिल्ह्यातील जनतेच्या पदरात मुख्यमंत्र्यांच्या दावोस भेटीच्या निमित्ताने मोठी गुंतवणूक पडली आहे. जागतिक आर्थिक फोरम परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीसाठी मोठी गुंतवणूक खेचून आणली आहे. या जिल्ह्यात जेएसडब्ल्यू ३ लाख कोटींची तर कल्याणी समूह ५२५० कोटींची गुंतवणूक करणार आहे. गडचिरोलीमध्ये गुंतवणुकीबाबत झालेले हे करार ही तर सुरुवात आहे. येत्या काळात आणखी काही उद्योग या मागास जिल्ह्याच्या मातीत रुजलेले दिसतील, असे मत व्यक्त होत आहे. कल्याणी समूह आणि महाराष्ट्र सरकार यांच्यादरम्यान स्टील आणि संरक्षण क्षेत्राबाबतचे करार झाले आहेत. त्यानुसार पोलाद उद्योगासाठी ५२५० कोटी रुपयांची गुंतवणूक जिल्ह्यात होत असून त्यातून तब्बल चार हजार लोकांना रोजगार उपलब्ध होतील. अर्थात एका कुटुंबातील किमान चार म्हणजे १६ हजार लोकांच्या जीवनाला प्रगतीचे पंख फुटणार आहेत. यातून गडचिरोलीच्या आर्थिक समृद्धीतही भर पडल्याशिवाय राहणार नाही.

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यकाळात राज्याच्या विकासात भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या योजना आणि धोरणांमुळे केवळ पायाभूत सुविधाच नव्हे तर कृषी, शिक्षण, उद्योग, पर्यटन, दूरसंचार, सिंचन आणि परदेशी गुंतवणुकीलाही चालना मिळाली आहे. त्यांच्याच नेतृत्वात मेट्रो, कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग, समुद्री बोगदा, अटल सेतू असे प्रकल्प मार्गी लागल्याने महाराष्ट्राची गतकाळात प्रगतीत झालेली पीछेहाट दूर झाली. त्यांचे नेतृत्व राज्याचे कल्याण करणारे असल्याची खात्री पटल्यानेच नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या विजयाचा मार्ग सुकर केला. शपथविधीनंतर लगेच देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याकडे आपले लक्ष केंद्रित केले. नववर्षाच्या प्रारंभी त्यांनी गडचिरोली गाठली आणि या जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन येथील जनतेला दिले. या नक्षलग्रस्त भागात उद्योग आणण्याची घोषणा करून, त्यांनी पंतप्रधानांसह विरोधी पक्षाच्या नेत्यांचीही प्रशस्ती मिळविली. जिल्ह्यासाठी दावोसहून मोठी गुंतवणूक आणून त्यांनी हा जिल्हा शेवटचा नव्हे तर पहिला असल्याचे जनतेला दाखवून दिले आहे. गडचिरोलीच्या कात टाकण्याची दखल माध्यमांनाही घ्यावी लागली. एरवी गडचिरोलीच्या नावाने नाक मुरडणाऱ्या माध्यमांना या जिल्ह्यात आलेल्या गुंतवणुकीची नोंद घेऊन त्यावर भाष्य करणे भाग पडले. येत्या काळात विकासाचे वारे वाहू लागल्याने हा जिल्हा संपूर्ण कात टाकेल, याची ग्वाहीच जणू या करारांमधून मिळाली आहे. रस्ते, पूल, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या क्रांतिकारी बदलांमुळे गडचिरोलीच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनमानात मोठा बदल घडणार एवढे निश्चित. विकासाच्या या वाटचालीत महाराष्ट्राचे युवा नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांनी या दुर्गम भागाच्या पायाभूत सुविधांपासून ते स्थानिक नागरिकांच्या जीवनशैलीपर्यंत सर्वांगीण प्रगतीसाठी प्रभावी योजना राबवल्या. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात परिवर्तनाचे आणि विकासाचे नवे पर्व दिसू लागले. जेएसडब्ल्यू गडचिरोलीत ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. त्यातूनही हजारो रोजगारांची निर्मिती स्थानिक वनवासींसह कौशल्यप्राप्त गरजू युवकांसाठी होणार आहे. रिकाम्या हातांना काम मिळाल्याने युवकांच्या टिवल्याबावल्या आपसूकच बंद पडतील. ऊठसूट पानटपरीकडे धाव घेण्याची युवकांची सवय मोडून पडेल. नोकरीची जबाबदारी आल्याने चकाट्या पिटण्याच्या सवयी बाजूला पडतील. बेरोजगारीमुळे वाढणारे गुन्हे आणि गुन्हेगारी वृत्तीकडे धाव घेण्याच्या प्रवृत्तीलाही आळा बसेल. या साऱ्या बाबी जिल्ह्यात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीमुळे साध्य होणार आहेत. त्यासाठी आया-बहिणींचे आशीर्वाद निश्चितच देवाभाऊंच्या पारड्यात पडल्याशिवाय राहणार नाही. हीच आशीर्वादरूपी जनतेची थाप त्यांना येत्या काळात प्रगतीच्या आणखी वाटांवर यश मिळवून देणारी ठरल्यास आश्चर्य वाटू नये. चालू वर्षाच्या पहिल्याच दिवशी देवाभाऊंनी गडचिरोलीमध्ये अनेक प्रकल्पांचे भूमिपूजन केले. आता या जिल्ह्याची स्टील सिटीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांनी लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या पोलाद कारखान्यासह विविध प्रकल्पांची पायाभरणी यापूर्वीच केली आहे. लॉयड काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल, विद्यानिकेतन सीबीएसई शाळा, वन्या क्लोविंग कंपनी, कौशल्य विकास केंद्र, फॅमिली क्वार्टर्स, पोलिस ऑफिसर्स फॅमिली क्वार्टर्स, जिमखाना, बालोद्यान, पोलिस मदत केंद्राच्या विकास यात्रेलाही त्यांनीच हिरवी झेंडी दाखविली आहे. देवेंद्रजींनी राज्याच्या विकासाला चालना देताना शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन दिलेले आहे. वंचित घटकातील लोकांना शासकीय वसतिगृहे आणि निवासाची सोय उपलब्ध करून दिली आहे. विविध समाजाच्या उत्थानासाठी निरनिराळ्या महामंडळांची घोषणा करून त्यांना त्या त्या समाजाच्या महापुरुषांची दिलेली नावे, कल्पक आणि नवी ऊर्जा निर्माण करणारी ठरली. महामंडळांची निव्वळ घोषणा करून ते थांबले नाहीत, तर त्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करून काही योजनांना अंतिम रूपही दिले. कृषी क्षेत्रात त्यांनी राबविलेल्या जलयुक्त शिवार आणि शेततळे योजना अतिशय सफल झाल्या. त्यांच्या कार्यकाळात पूर्ण झालेल्या या प्रकल्पांचे पुरस्कर्ते आजही त्यांना कृषी क्षेत्रातील या क्रांतीसाठी धन्यवाद देतात. त्यांच्या पुढाकारामुळे गडचिरोली जिल्ह्यातील वनवासी युवकांच्या नक्षल चळवळीत सामील होण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली, हे कुणीच नाकारू शकणार नाही. गडचिरोली जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी ते गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील आहेत. इथला नक्षलवाद आणि त्यांना सैद्धांतिक पाठिंबा देणारी अर्बन नक्षल्यांची शक्ती नामशेष करून सामान्य माणसांना राष्ट्रीय प्रवाहाशी जोडण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत गडचिरोलीतील युवक नक्षलवाद्यांच्या संघटनांमध्ये सहभागी झाल्याची नोंद नाही. उलट अनेक नक्षली आत्मसमर्पण करून सन्मानाने जगण्याचा मार्ग निवडत आहेत. गडचिरोलीच्या विकासाला फडणवीसांनी लावलेल्या पंखांमुळेच हे सारे शक्य झाले आहे. ■

इतस्ततः

डॉ. विवेक राजे

ग्रुमिंग गँग्ज

"सर, ग्रुमिंग गँग्ज हे काय प्रकरण आहे?'' अक्षयने चालता चालता विचारले. सकाळी उठून मैदानावर अनेक आबालवृद्ध रोज व्यायाम करण्यासाठी येतात. त्यातलाच एक जास्त संवेदनशील आणि चौकस असलेल्या या तरुणाने मला हा प्रश्न विचारला.

''तुला आपल्या भारतातील अजमेर बलात्कार प्रकरण माहिती आहे का?''

''हां.. थोडं फार आठवतंय. पण तुम्ही पुन्हा सांगितलं तर..., म्हणजे साधारणपणे १९९० च्या दशकात शाळकरी मुलींच्या बाबतीत भारतात घडलेले आणि ज्यात अजमेरच्या दर्ग्याच्या व्यवस्थापनातील मुस्लिम मुखंडांचा समावेश होता तेच ना हे प्रकरण...'' तो म्हणाला.

''बरोबर सांगतोय तू अक्षय. हे भारतात घडलेले प्रकरण होते. १९९२ मध्ये अजमेर येथे ११ ते २० वर्षे वयाच्या २५० विद्यार्थिनींवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची ही केस होती. यात विद्यार्थिनींना फसवून फार्म हाऊसवर नेऊन त्यांचे यौन उत्पीडन करण्यात येत असे. अनेक मुसलमान पुरुष विशेषतः अजमेर दर्ग्याशी संबंधित असलेले मुस्लिम यात सहभागी होते. या मुलींवर बलात्कार करून त्याचे फोटो किंवा व्हिडिओ काढून त्यांचा पुढे याच मुलींना ब्लॅकमेल करण्यासाठी वापर करण्यात आला, असे निष्पन्न झाले. असे फोटो किंवा व्हिडीओंचा वापर करून या फसवणूक झालेल्या मुलींच्या मैत्रिणी, नातेवाईक महिला, मुली यांनादेखील जाळ्यात ओढण्यात आले. यात फक्त हिंदू महिलांनाच भ्रष्ट केले गेले तसेच या सर्व साहित्याचा वापर शोषित महिलांनी या विरोधात कोठे वाच्यता करू नये म्हणून करण्यात आला. अजमेर येथील एका स्थानिक वार्तापत्राने या प्रकरणाची माहिती पोलिसांना दिली व मग हे सगळे प्रकरण उजेडात आले. अजमेर न्यायालयात सर्व आरोप सिद्ध झाले. सर्व आरोपी तथाकथित प्रतिष्ठित मुस्लिम घरातील आणि अजमेर दर्ग्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित होते हे विशेष. तरीही या प्रकरणी वर्तमानपत्र वा वृत्तवाहिन्यांनी गप्प राहणे पसंत केले. असेच एक प्रकरण इंग्लंडमध्ये घडले; ज्यात दोन हजारांहून जास्त ब्रिटिश मुलींवर बलात्कार केले गेले. यातही ब्रिटनमध्ये स्थलांतरित मुस्लिम आणि विशेषतः पाकिस्तानी वंशाचे पुरुषच गुन्हेगार होते. विशेष म्हणजे या गुन्हेगारांच्या विविध टोळ्या होत्या. पण हे सगळे प्रकरण इस्लामिक लोकांशी संबंधित असल्याने आणि इस्लामविषयी काहीही लिहिणे म्हणजे युरोपमधील 'वोक' विचारसरणीच्या लोकांचा रोष ओढवून घेणे असल्याने तेथील मीडियादेखील गप्प बसला होता...''

''बापरे... हे फारच भयंकर आहे.'' अक्षय म्हणाला.

''अरे बाबा, हे एक 'वोक' विचारसरणीचे कारस्थानच आहे. 'इस्लामोफोब' हा शब्द जगभरात गेल्या काही दशकांत शिवीसारखा वापरला जाताना दिसतो. आधी एखाद्या माणसावर, लेखकावर किंवा पत्रकारावर 'इस्लामोफोब' असल्याचा आरोप केला; मग त्या माणसाचे सामाजिक जीवन उरणार नाही, याची काळजी घेतली जाते. त्याच्या समोर असंख्य अडचणी निर्माण केल्या जातात. इतक्या की, त्याला जीवन नकोसे वाटू लागावे. त्यामुळे आजकाल आपल्यावर 'इस्लामोफोब' असा शिक्का बसणार नाही, याची काळजी घेतच कोणताही युरोपियन नागरिक इस्लामविषयी आपली मते व्यक्त करताना दिसतो. मुस्लिम धर्म, त्या धर्मातील चुकीच्या प्रथा यावर टीकाटिप्पणी करणे लोकं टाळताना दिसतात. याला ब्रिटनमधले कोणीही अपवाद नाहीत. आपल्याला इस्लामोफोबिया नाही, हे दाखवण्याचा प्रयत्न सरकारी वकिलापासून पंतप्रधान किंवा अगदी ब्रिटिश राजघराण्यातील लोकही करताना दिसतात. इस्लामविरोधी असल्याचा शिक्का आपल्यावर बसू नये याची काही ठळक अपवाद सोडले तर सगळेच प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित लोक आज विशेष काळजी घेताना दिसतात. सध्या ॲलन मस्क यांनी ब्रिटिश पंतप्रधान किअर स्टार्मर यांच्यावर केलेल्या आरोपांमुळे गाजत असलेले ग्रुमिंग किंवा रेपिंग गँग्ज हे दुर्दैवाने याच मानसिकतेचा परिपाक ठरते. इंग्लंडमध्ये मागील २५ ते ३० वर्षांपासून हा प्रकार चालला आहे. १०-१५ वय असलेल्या श्वेतवर्णीय ब्रिटिश मुलींवर ३० वर्षांहून अधिक असलेल्या पाकिस्तानी पुरुषांनी बलात्कार, सामूहिक बलात्कार, हत्या, अपहरण, जबरदस्तीने किंवा फसवून ड्रग्ज देणे असे गुन्हे केलेले आहेत. अनेक शहरांमध्ये या गँग्जनी हे घृणास्पद गुन्हे केलेले आहेत. यासाठी निष्पाप अल्पवयीन मुलींना हेरून, ओळख वाढवून त्यांच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले जातात. या सगळ्या प्रकाराचे व्हिडीओ काढून मग त्याचा वापर करून याच मुलींना, त्यांच्या मैत्रिणी, बहिणी, नातेवाईक मुलींना घेऊन येण्यासाठी भाग पाडले जाते. मादक पदार्थांचे व्यसन लावले जाते. त्यानंतर या मुलींना हे गुन्हेगार त्यांच्या ओळखीच्या गटांमध्ये शब्दशः वाटतात किंवा फिरवतात.''

''हे सगळं फारच भयानक आहे. यांच्यापेक्षा आमच्या देशांतील स्थिती पुष्कळच बरी आहे म्हणायला हवी.'' अक्षयने आपले मत नोंदवले.

''बरोबर आहे तू म्हणतोस ते. कारण अशा गुन्ह्यांच्या बाबतीत ब्रिटनमधील सरकारी यंत्रणा कमालीची उदासीन होती. त्यातही या खटल्याच्या वेळी सरकारी वकील असलेल्या कीअर स्टार्मरने हे प्रकरण अक्षरशः दाबून टाकले; जो आज त्यांचा पंतप्रधान आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी २०२३ मध्ये एक समिती स्थापन केली होती. या समितीने एकाच वर्षात ५०० पेक्षा जास्त संशयितांना ताब्यातदेखील घेतले होते. पण दुर्दैवाने ज्याने हे प्रकरण दाबून टाकले तीच व्यक्ती त्या देशाची पंतप्रधान आहे...''

''म्हणजे दोन्ही ठिकाणी अशा हीन दर्जाच्या गुन्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मीय लोकंच सामील असल्याचे दिसते. याला कारण काय असावे?'' अक्षयचा प्रश्न.

''याला कारण या लोकांची मानसिकता होय. इस्लाम धर्म हा कोणताही बदल न स्वीकारणारा या जगातील एकमेव धर्म आहे. या धर्मात मागील दोन हजार वर्षांत काहीही दुरुस्ती केली गेलेली नाही. काळानुरूप इतर सर्व धर्मांनी स्वतःत बदल केले. पण आमचे धर्म ग्रंथ हे थेट अल्लाच्या मुखातून आले असल्याने त्यात कोणताही बदल आम्हाला मान्य नाही, अशी या लोकांची भूमिका आहे. त्यांच्या धर्म ग्रंथात काही बदल केले तर दोन-तीन पिढ्यांमध्ये ही मानसिकता बदलू शकते. आज जगभर बदनामी पत्करूनही हा समाज हे बदल करू इच्छित नाही. आधुनिक शिक्षण नाही, हलाखीची आर्थिक स्थिती हे या समाजाचे सर्वसामान्य वैशिष्ट्य ठरते.''

''पण काळाबरोबर जर एखादा समाज किंवा धर्म बदलण्यास तयार नसेल तर त्याचे दुष्परिणाम सगळ्या मानव जातीला भोगावे लागणार नाहीत का?'' अक्षय.

''निश्चितच सगळ्या जगाला आणि मानव जातीला याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. बदलण्याची तयारी नसल्यामुळे चुकीचे विचार यांना चुकीच्या मार्गावर नेत आहेत. त्यातच आधुनिक सांस्कृतिक साम्यवादी म्हणजे वोक अराजकतावादी विचारसरणी स्वतःच्या फायद्यासाठी इस्लामला साथ देताना दिसते किंवा हे वोक लोकं आज जगात जमेल तिथे अराजक माजवण्यासाठी इस्लामचा वापर करताना दिसतात...''

''यावर उपाय काय आहे.'' अक्षयने घाईने आपला प्रश्न केला.

''बघ अक्षय, इतर देशांनी काय करावे, हा त्यांचा प्रश्न आहे. पण आपण भारत म्हणून काही गोष्टी निश्चितच करू शकतो. एक म्हणजे या देशात मागील ५०-६० वर्षांत साम्यवाद्यांनी तयार केलेली इको सिस्टिम आणि नॅरेटिव्हज आम्ही हुट आऊट केले पाहिजे. त्यांनी आमच्या इतिहासाची केलेली इस्लाम धार्जिणी मांडणी दुरुस्त केली पाहिजे. त्यांनी केलेली शोषक आणि शोषित ही मांडणी निदान भारतासाठी चुकीची आहे, हे पुराव्यानिशी सांगितले पाहिजे. या देशात खरे शोषक हे मुस्लिम आणि इंग्रज राज्यकर्ते होते हे समाजाला समजावून सांगितले पाहिजे.''

''पण असे पुरावे आहेत का की, आपणही वोक लोकांसारखेच करणार.'' अक्षयचा उतावीळ प्रश्न.

''मुस्लिम कर पद्धती, स्त्री विषयक दृष्टिकोन हे याचे स्पष्ट पुरावे आहेत तसेच इंग्रजांनी येथील शिक्षण आणि उद्योग संपविण्यासाठी लावलेली कर पद्धती हे सहजच स्पष्ट करते. पण तो विषय उद्या बोलूयात.'' मी विषयाला आवरते घेत म्हणालो.

''हो हो.. मलाही उशीर झालाय. पण ग्रुमिंग गँग्ज आणि त्यांचे कारनामे दाबून टाकण्यामागील विचारसरणी बदलण्यासाठी प्रयत्न केलेच पाहिजेत...'' ■

९८८१२४२२२४

वेध

नीलेश जोशी

सोशल मीडिया... पालकांची परवानगी

सोशल मीडिया अर्थात समाजमाध्यम हा लहानांपासून थोरांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यातही लहान मुलांचा समाजमाध्यमांवरील वावर दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. गत काळात एका सर्वेक्षणानुसार १४ वर्षांवरील ८३ टक्के मुलांजवळ एक तर स्वतःचा स्मार्ट फोन आहे किंवा त्यांच्या आई-वडिलांकडे असलेल्या स्मार्ट फोनवर ते सक्रिय असतात. दुर्दैवाने मध्यंतरीच्या कोविड काळात नाईलाज म्हणून मुलांच्या हातात स्मार्ट फोन द्यावा लागला; आता याच स्मार्ट फोनवर विविध समाजमाध्यमात सक्रिय असणाऱ्या मुलांचे मानसिक आरोग्य ही सर्वांची चिंता वाढविणारी आहे. एवढेच नव्हे, इतरही अनेक प्रश्न समाजमाध्यमांच्या अविवेकी वापरामुळे निर्माण झाले आहेत.

या समस्या, प्रश्न असतानाच समाजमाध्यमावरील 'डिजिटल डेटा' सुरक्षित नसल्याने अनेक जण आभासी फसवणुकीला बळी पडले. यात आर्थिक फसवणुकीसह इतर फसवणुकीने अनेकांचा जीवही गेला आहे. म्हणूनच केंद्र शासनाने डिजिटल डेटा प्रोटेक्शन कायद्याचे पाऊल यापूर्वीच उचलले आहे. आता या कायद्याच्या मसुद्यात १८ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया अकाऊंट सुरू करण्यासाठी त्यांच्या पालकांची संमती घ्यावी लागेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या या तरतुदीचे स्वागतच केले पाहिजे. केंद्र शासनाने ऑगस्ट २०२३ मध्ये डिजिटल डेटा प्रोटेक्शन कायदा मंजूर केला. या कायद्यात शासनाने नवीन तरतूद जोडून आता १८ वर्षांखालील म्हणजेच अल्पवयीन मुलांचा सोशल मीडियातील डेटा वापरण्यासाठी त्यांच्या पालकांची परवानगी आवश्यक असणार आहे. जोपर्यंत ही परवानगी मिळत नाही, तोपर्यंत कोणतीही संस्था मुलांच्या अकाऊंट्समधील माहिती वापरू किंवा साठवू शकत नाही, असा कायदा प्रस्तावित केला आहे. त्यासाठी मसुदा तयार करून १८ फेब्रुवारीपर्यंत त्यात सूचना असल्यास त्या सुचविण्यासाठीचा कालावधी देण्यात आला आहे. समाजमाध्यमाचा वापर करून विविध सामाजिक गुन्हे झाल्याचे पाहावयास मिळतात. अविवेकी, अनिर्बंध समाजमाध्यमाचा वापर सामाजिक सलोखा बिघडविण्यास कारणीभूत ठरल्याची उदाहरणे आहेत. अकोल्यासारख्या संवेदनशील शहराने त्याचा अनुभव गतवर्षी घेतला. शहरात १३ मे रोजी दंगल उसळली. या दंगलीत एकाचा मृत्यू झाला. ही दंगल इन्स्टाग्रामवर झालेल्या विसंवादातून झाल्याचे नंतर समोर आले. याशिवाय गुन्हे घडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अनेक बाबींना समाजमाध्यम जबाबदार असल्याचे दिसून येते. अमली पदार्थांचे व्यसन हे अत्यंत घातक मानले जाते. आता मात्र त्यापेक्षाही घातक व्यसन समाजमाध्यमाचे आहे. त्यातही डिजिटल खेळांमुळे एक पूर्ण पिढी मानसिक आणि शारीरिक आजाराला बळी पडली. काही खेळांमुळे तर मानसिक विकृतीसह अनेकांना प्राण गमवावा लागला. □□इन्स्टाग्राम, फेसबुक आदींसारख्या सोशल मीडियावर खरी ओळख लपवून अल्पवयीन मुलींची फसवणुकीच्या घटनादेखील गत काळात समोर आल्या. यासह समाजमाध्यमांमुळे समाजविघातक अनेक गोष्टी वाढत असतानाच बराच काळ विचाराधीन असणाऱ्या या विषयी आता केंद्र शासनाने पुढाकार घेत भारतीय मुलांचे जीवन डिजिटल जगात सुरक्षित करण्यासाठी नवीन कायद्यासाठी अत्यंत आवश्यक असे पाऊल उचलले आहे. या कायद्यामुळे अल्पवयीन मुलांचा समाजमाध्यम अर्थात सोशल मीडियाचा वापर सुरक्षित आणि कमीत कमी व्हावा असा प्रयत्न या कायद्याद्वारे शासन करणार आहे. भारतीय समाज व्यवस्थेचे मोठे वैशिष्ट्य कुटुंब व्यवस्था मानली जाते. ज्येष्ठांचे अनुकरण कुटुंबातील चिमुकले नकळत करीत असतात. कुटुंबातील संस्कार हे व्यक्तिमत्त्व जडणघडणीत मोठी भूमिका निभावतात. त्यामुळे भौतिक सुख-सुविधा सहज उपलब्ध होणाऱ्या या काळात समाजमाध्यम आणि त्याचा वापर याकडे कुटुंबातील ज्येष्ठांनीही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. शासनस्तरावर या गंभीर समस्येसाठी उपाययोजना करीत असतानाच त्याला समाजाचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला तरच या प्रस्तावित कायद्याची नीट अंमलबजावणी होऊ शकेल. म्हणूनच शासनाने घेतलेल्या सकारात्मक पुढाकारात समाजानेदेखील बळ द्यावे. ■

९४२२८६२४८४

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

राहुल गांधींचे डोके फिरले तर नाही...!

काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या नव्या मुख्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणावरून नवा वाद निर्माण झाला आहे. वादग्रस्त विधाने करत स्वत:सोबत पक्षालाही अडचणीत आणण्याची आता राहुल गांधी यांना सवय झाली; नव्हे आधीच अडचणीत असलेल्या पक्षाला आणखी अडचणीत आणण्यासाठीच राहुल गांधी यांचा जन्म झाला की काय, असे वाटण्यासारखी स्थिती आहे. राहुल गांधी अशी वादग्रस्त विधाने अनावधानाने करतात की जाणीवपूर्वक हे समजत नाही. मात्र काहीही असले, तरी त्यामुळे ते स्वत: अडचणीत येतात आणि पक्षालाही वारंवार अडचणीत आणत असतात.

राहुल गांधी यांचे ताजे विधान अतिशय धक्कादायक आहे. यातून त्यांनी देशाविरुद्ध लढण्याचे आवाहन जनतेला केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते असलेल्या राहुल गांधी यांनी प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून भाजपावर तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणे समजण्यासारखे आहे. पण रा. स्व. संघावर टीका करताना त्यात देशाला ओढणे अनाकलनीय आहे. आपण भाजपा, रा. स. संघ आणि भारत राष्ट्राशी लढत आहे; हा राजकीय संघर्ष नाही, असे विधान राहुल गांधी यांनी केले. राहुल गांधी यांना नेमके म्हणायचे काय हे त्यांनाही समजले की नाही, ते समजायला मार्ग नाही. भाजपा आणि रा. स्व. संघाविरुद्ध राहुल गांधी आणि काँग्रेस लढत आहे, हे एकवेळ समजून घेता येईल, पण 'भारत राष्ट्राविरुद्ध आपल्याला लढायचे आहे' या वाक्याचा अर्थ त्यांनी स्पष्ट करून सांगितला पाहिजे. आपण काय बोलतो, त्याचा अर्थ काय निघू शकतो आणि त्याचा परिणाम काय होऊ शकतो, याचा विचार बोलायच्या आधी राहुल गांधी करत नाही असे दिसते किंवा विचार करण्याची क्षमताच त्यांच्यात नाही, असे म्हणायचे का? राहुल गांधी आता फक्त खासदार वा काँग्रेसचे अध्यक्ष नाहीत तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते अशा घटनात्मक पदावर आहेत. घटनात्मक पदावरील व्यक्तीने कसे वागावे, कसे बोलावे याचे काही निकष तसेच संकेत आणि मर्यादा असतात, पण राहुल गांधी यांनी सर्व संकेत आणि मर्यादा धाब्यावर बसवल्या आहेत. राहुल गांधी देशाविरुद्ध लढण्याची भाषा कशी काय करू शकतात, याचे आश्चर्य वाटते. त्यांची भाषणे कोण लिहितात, लिहिलेली ही भाषणे नंतर पक्षातील वरिष्ठ नेते वा माध्यम विभागातील कर्तेधर्ते तपासत नाही का, अशा प्रश्न पडतो. व्यासपीठावर भाषणाला उभे होण्याच्या आधी राहुल गांधी आपले भाषण तपासत नाही का? त्यात स्वत:चे (असेलच तर) डोके वापरून त्यात सुधारणा करत नाही का, असाही प्रश्न आहे.

विशेष म्हणजे यावेळी काँग्रेस पक्षाच्या नव्या मुख्यालयाच्या उद्घाटनाचा मुहूर्त त्यांनी पाहिला. आधीच्या जुन्या २४, अकबर रोड या काँग्रेस मुख्यालयातूनही राहुल गांधी यांनी पक्षाला वारंवार अडचणीत आणले होते. आता नवीन मुख्यालयातूनही त्यांनी पक्षाला अडचणीत आणण्याचा पहिल्याच दिवशी श्रीगणेशा केला. राहुल गांधी यांनी आपल्या वर्तनाने आणि शब्दांनी काँग्रेस पक्षाचे जेवढे नुकसान केले, तेवढे आजपर्यंत एकाही अध्यक्षाने अगदी सीताराम केसरी यांनीही केले नाही. देशाविरुद्ध लढण्यासाठी देशवासीयांना चिथावण्याची भाषा करत राहुल गांधी यांनी आपला राष्ट्रद्रोहीपणा सिद्ध केला आहे. राहुल गांधी यावेळी जी भाषा बोलले ती माओवादी, नक्षलवादी आणि अतिरेक्यांची भाषा आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. आपल्या या विधानाने राहुल गांधी यांनी स्वत:ला माओवादी, नक्षलवादी आणि अतिरेक्यांच्या लाईनमध्ये उभे केले आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी आतापर्यंत केलेले सर्व माफ करण्यासारखे असले, तरी यावेळचा त्यांचा गुन्हा माफ करण्यासारखा नाही. देशाविरुद्ध लढण्याचे आवाहन करणारा, मग तो कोणीही असो, त्याची कृती ही राष्ट्रद्रोहाची आहे, यात शंका नाही. त्यामुळे आज रामशास्त्री प्रभुणेंसारखे न्यायाधीश असते, तर त्यांनी राहुल गांधींच्या या गुन्ह्यासाठी त्यांना देहांत प्रायश्चित्ताची सजा निश्चितच सुनावली असती, यात शंका नाही. राहुल गांधी यांच्यामुळे आतापर्यंत काँग्रेस पक्षाचा एक पैशाचाही फायदा झाला नाही. आपल्या नेतृत्वात आतापर्यंत एकही निवडणूक ते पक्षाला जिंकून देऊ शकले नाही. राहुल गांधी काँग्रेस अध्यक्ष झाल्यानंतर एकाही राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष विजयी झाला नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीचा तर प्रश्नच उद्भवत नाही. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात सलग तीन लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा नुसता नाही तर दारुण पराभव झाला. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सत्ता तर सोडा; पण विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढ्याही जागा काँग्रेस पक्षाला मिळाल्या नाहीत. तरीसुद्धा राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. काँग्रेस पक्षाचे डोळे मिटवल्याशिवाय राहुल गांधींना शहाणपण येणार नाही, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. भाजपा आतापर्यंत काँग्रेसमुक्त भारताच्या गोष्टी करीत होती, पण भाजपाचे हे विधान राहुल गांधी यांनी फारच मनावर घेतलेले दिसते. भाजपाचे काँग्रेसमुक्त भारताचे स्वप्न साकारण्यासाठी भाजपा नेत्यांनी जेवढा पुढाकार घेतला नाही, त्यापेक्षा जास्त पुढाकार राहुल गांधी घेत आहेत, याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. राहुल गांधींनी आपल्या कर्तृत्वाने काँग्रेस पक्षाचेच नाही तर समस्त इंडिया आघाडीचेही नुसते नुकसान नाही तर वाटोळे केले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षात तसेच इंडिया आघाडीतही राहुल गांधींचे नेतृत्व स्वीकारायची कोणाची तयारी नाही. इंडिया आघाडीतून एक एक पक्ष बाहेर पडत आहे. याला राहुल गांधी यांचा स्वभाव आणि नेतृत्व कारणीभूत आहे. राहुल गांधी यांना पक्षातील आपले मित्र टिकवता आले नाही, ते मित्रपक्ष

संक्षिप्त वृत्त...

जिंतूरातील एकलव्य विद्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताह अभियानांतर्गत जनजागृती मोहिम

जिंतूर,/प्रतिनिधी : दिनांक, १८/०१/२०२५ रोजी जिंतूर महामार्ग ७५२ जवळील एकलव्य बाल विद्यामंदिर शाळेमध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. वाहतुकीचे नियम सांगून वाहनावरील जुने दंड भरून घेणेबाबत कळवून तसेच हेल्मेट वापरण्याचे फायदे तसेच सीट बेल्ट वापरणे दारू पिवून वाहन चालू नये. तसेच वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करू नये वगैरे माहिती दिली अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत केल्यास तुम्हाला पोलीसा कडून कोणतीही अडचण येणार नाही तसेच अपघात संबंधाने मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा बाबत शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच पालक यांना माहिती दिली या वेळी इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थी हजर होते तसेच सदर वेळी पोलीस उप कदम, अंमलदार काळे/१३२६ व पीसी/२५६ गिराम ,पो.शी. जोधळे ,पो.शी.पारखे.असे हजर होते

श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे आयोजन

जिंतूर,/प्रतिनिधी : येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन तालुका क्रीडा समन्वयक श्री. डी. एस. चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य खंडेराव भिसे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. अनिल मेटांगळे व पत्रकार श्री. सचिन रायपत्रीवार उपस्थित होते, तसेच प्राचार्य कैलास मुटकुळे, प्राचार्या सुवर्णा घुगे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात कु.प्रियंका ठोंबरे, कु. प्राजक्ता खिल्लारे, कु. आरती ठोंबरे, कु. कीर्ती चिलगर या विद्यार्थ्यांनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. यावेळी श्री. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्याने इतर कला, क्रीडा प्रकार आत्मसात करणे गरजेचे आहे. शैक्षणिक जीवनातच हे सर्व आपल्यासाठी उपलब्ध असते. खऱ्या अर्थाने इथेच आपल्या सुप्त गुणांचा विकास साधला जाऊ शकतो. तेव्हा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवला पाहिजे, असे श्री चव्हाण यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले. यावेळी श्री अनिल मेटांगळे यांनीही आपले विचार मांडले. अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हनुमान सोळंके यांनी तर सूत्रसंचालन प्रा. कृष्णा गजभारे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. कापरे, प्रा. मते, प्रा. वर्णे कर ,प्रा. तळेकर, प्रा. बोराळकर, प्रा. माकोडे, प्रा .सोमानी ,प्रा. लोणे मॅडम, प्रा. घुगे, प्रा. भिसे, प्रा. आदाबे, प्रा. पंढरपूरे ,प्रा. इंगळे ,प्रा. वाघ, प्रा. सोमानी एस, प्रा. काझी ,प्रा. क्षीरसागर, डॉ. राठोड, प्रा. वाघमारे मॅडम, प्रा. मोरे मॅडम, प्रा. बोधडकर मॅडम, श्री. जाधव, श्री चव्हाण, श्री. पोटेकर, श्री. भवाळे, श्री. दहिफळे, श्री. वट्टमवार, सोपान घोडे, विठ्ठल सातपुते ,संतोष देवकर आदींनी परिश्रम घेतले

त्या भुखंडाची सविस्तर चौकशी व्हावी- टाले

रामप्रसाद कंठाळे

जिंतूर ,/प्रतिनिधी-: जिंतूर जि. परभणी येथील औंढा रोड वरील सर्वे नंबर ९४ मधील मंजूर एन.ए.लेआउट संबंधी ओपन स्पेसचा भूखंडाचा श्रीखंड करून विक्री करणाऱ्याचा व लेआउट मंजुरी देणारे अधिकाऱ्यांनी भूखंड धारकाशी संगणमत करून या ठिकाणी भौतिक सुविधा व नागरिक सुविधा न देता ओपन स्पेस गायब करणारे भूमाफिया यांनी कागदपत्राची पूर्तता करून शासनाची दिशाभूल करून जागेवर ओपन स्पेस अस्तित्वात नसताना मंजुरी दिली यासाठी जबाबदार नगर परिषद कर्मचारी व अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करणे बाबत, म ह ा े द य , जिंतूर जि परभणी नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ९४ मधील ०० हेक्टर ६१ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी,प्रदीप जगताप नगरपरिषद जिंतूर यांनी लेआउट अभिन्यास मंजूर केलेल्या अभिन्यासामध्ये ओपन स्पेसची जागा दर्शविली असून वस्तुस्थितीत ओपन स्पेस भूखंड अस्तित्वात नसून गायब आहे या प्रस्तुत प्रकरणी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार तक्रार दिली आहे परंतु चौकशीच्या नावाखाली अद्यापर्यंत कोणतीही प्रकारची कारवाई झाली नसल्यामुळे आपल्या कार्यालयासमोर तक्रारदारांनी लोकशाही मार्गाने आमरण उपोषण केले परंतु अद्याप पर्यंत कोणती कारवाई झाली नाही

जिंतूर नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ९४ मधील ०० हेक्टर ६१ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी,प्रदीप जगताप नगरपरिषद जिंतूर यांनी जमीन मालक सुरेंद्र गेंदमल बाठिंया यांच्याशी संगणमत करून चुकिच्या पद्धतीने लेआउट अभिन्यास मंजूर करून मंजूर लेआऊट अभिन्यासामध्ये ओपन स्पेसची जागा दर्शविली असून वस्तुस्थितीत ओपन स्पेस भूखंड सोडले नसल्याने सदर भूखंड कुठे गायब झाला कुठे विक्री झाला याची प्रत्यक्षात पाहणी करणे गरजेचे आहे परंतु मा.जिल्हा प्रशासन अधिकारी तथा नगरपालिका प्रशासन अधिकारी,प्रदीप जगताप नगरपालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी हे प्रस्तुत प्रकरण हे त्यांच्याच विरुद्ध असल्याकारणाने त्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही किंवा कारवाई केलेली असेल तर त्याबाबत तक्रारदार यांना पत्रव्यवहाराद्वारे कळविण्यात यावे याबाबतप्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी, परभणी यांचे आपल्या स्तरावरून चौकशी समिती गठीत करून सदरील प्रकरणी स्थळ पाहणी करून तसेच जायमोक्यावर मोजणी करतेवेळी तक्रारदारांच्या समक्ष चौकशी करावी किंवा महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण () अधिनियम अंतर्गत चौकशी करण्यासाठी आपल्या स्तरावरून पत्राद्वारे कळविण्यात यावे या भूखंड प्रकरणात जे अधिकारी कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत गंगाधरआप्पा टाले यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम बंद ?

बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम बंद असल्याने खातेदारासह नागरिकांची हेळसांड.... व्यवस्थापकाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

पूर्णा,/प्रतिनिधी: शहरातील महावीर नगर येथील बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचे एटीएम बंद असल्यामुळे ग्राहकांची हेळसांड होत आहे. शहरामध्ये या बँकेचे खातेदारांची संख्या भरपूर आहे. शहरात दोनच नॅशनल बँक असून या अगोदर बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम सुरळीत होते. परंतु गेल्या सुमारे १३ महिन्यापासून येथील रेल्वे स्टेशन रोडवरील एटीएम बंद अवस्थेत आहे. वेळोवेळी व्यवस्थापकाला खातेदारांनी सूचना करूनही याकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

नवीन खातेदारांना पिन जनरेट करण्यासाठी नांदेड परभणी तब्बल ४० किलोमीटर दूर जाऊन पिन जनरेट करावा लागत आहे. बँकेच्या कारभारावर वरिष्ठांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन त्वरित एटीएम चालू करण्यात यावे अशी मागणी खातेदाराकडून होत आहे. एक परिवार एक बँक ब्रीद वाक्य असलेली बँक ऑफ महाराष्ट्र परिवारातील सदस्याकडे, त्यांच्या समस्या कडे लक्ष देईल का?

राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त पूर्णेत विविध स्पर्धांचे आयोजन

पूर्णा,/प्रतिनिधी: राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त पूर्णेत विविध स्पर्धांचे आयोजन

पूर्णा,प्रतिनिधी/

भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस २५ जानेवारी २०११ पासून देशभरात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पुर्णा येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार माधव बोथीकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

विद्या प्रसारणी सभेचे हायस्कूल येथे बुधवार, (दि. २२) रोजी सकाळी ११ वाजता निबंध व रांगोळी स्पर्धा, अभिनव विद्या विहार येथे गुरुवार दि. २३ रोजी सकाळी ११ वाजता चित्रकला स्पर्धा आणि श्री. गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालयात शुक्रवारी सकाळी ११ वाजता वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरित्या त्यांची नाव नोंदणी करुन घेणे, प्रत्येक निवडणुकीत मतदान करणे व लोकशाहीवर जनतेची निष्ठा ठेवण्यासाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम घेणे, विविध वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध स्पर्धाद्वारे व इतर माध्यमातून लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने जनजागृती करणे हा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश आहे. १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनाची यंदाची 'मतदानासारखे काहीच नाही, मी नक्की मतदान करणार', अशी आयोगाकडून देण्यात आली आहे. १५ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याच्या दृष्टीने तालुक्यातील सर्व शाळा/महाविद्यालयाने इयत्ता ६ वी ते ८ वी आणि इयत्ता ९ वी. ते १२ वी. असे दोन गट तयार करून त्यांची निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धासाठी एकाची निवड करणे. त्यानंतर शाळास्तरावर निवड केलेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा तालुकास्तरावर २४ जानेवारी रोजी घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यातून प्रथम, दितीय व तृतीय क्रमांक येणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार केला जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मतदान केंद्रावर संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिका-यामार्फत दि.२५ जानेवारी, २०२५ रोजी १५ व्या राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यावेळी नवमतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात यावेत. मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी विविध व्हिडीओ, व्होटर हेल्पलाईन, ऑनलाईन इपिक कार्डबद्दल माहिती देणार आहेत. तसेच मतदान केंद्रावर शपथ देण्यात येणार आहे.

त्यामध्ये जास्तीत जास्त नव मतदार आणि जनतेने सहभाग नोंदवावा. तालुक्यातील सर्व नवमतदारांनी नावनोंदणी मतदार यादीमध्ये करून घ्यावी. तसेच सर्व जनतेने सर्व निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीवर निष्ठा वाढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुर्णा शहरातील शाळा, महाविद्यालयातील इयता ८ वी ते १२ वी मधील विद्यार्थी रॅली सकाळी ८ वाजेदरम्यान संबंधित शाळा, महाविद्यालयापासून निघून गट शिक्षणधिकारी, गट साधन केंद्र मैदान, बौध्द विहार जवळ, बसस्थानक रोड, पूर्णा येथे सकाळी ९ वाजेदरम्यान राष्ट्रीय मतदान दिनाची प्रतिज्ञा व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे तहसीलदार माधवराव बोथीकर,नायब तहसीलदार पंढरीनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

सोनपेठ येथील मॉर्निंग वॉक ग्रुप तर्फे गणवेश वाटप

प्रजासत्ताक दिनी आश्रमशाळेच्या विद्यार्थी दिसणार नव्या गणवेशात

सोनपेठ/प्रतिनिधी: यशोधरा आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गणवेश वाटप करुन सोनपेठ येथील मॉर्निंग वॉक ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमातून मानवतेची शिकवण दिसून येत आहे. समाजात लोक वेगवेगळ्या कारणांमुळे एकत्र जमत असतात . स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अनेक जण सकाळच्या स्वच्छ वातावरणात फिरायला जातात . सोनपेठ शहरात सकाळी फिरायला जाणाऱ्या शहरातील विविध क्षेत्रातील लोकांनी एकत्र येऊन एक मॉर्निंग वॉक ग्रुप तयार केला .या ग्रुपच्या माध्यमातून नुसते फिरणेच नाही तर अनेक उपक्रम राबवले जातात . या ग्रुपचे सदस्य फिरत असतांना शहरातील अनुसुचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी यशोधरा निवासी आश्रमशाळा चालवणाऱ्या मुख्याध्यापक प्रकाश राठोड यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश नसल्याची खंत व्यक्त केली. यावरुन गटातील सदस्यांनी या वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन गणवेशाचे वाटप करण्यासाठी ठरवले .

मॉर्निंग वॉक ग्रुपच्या माध्यमातून यशोधरा निवासी आश्रमशाळेतील १५० विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्यात आले.

या गणवेषांचे वाटप दि.२१ रोजी यशोधरा आश्रमशाळेच्या सभागृहात हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री परमेश्वर कदम यांच्या हस्ते वाटप, करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारत राष्ट्र समितीचे नेते सुधीर बिंदू,केंद्र प्रमुख शेषराव राठोड, मुख्याध्यापक प्रदिप गायकवाड मुख्याध्यापक प्रकाश राठोड यांच्या सह पत्रकार विद्याधर शिरसाठ यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या वेळी सुधीर बिंदू यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधुन त्यांना मार्गदर्शन केले .

कार्यक्रमाचे सुत्र संचालन लता खंदारे यांनी केले तर आभार व्यक्त करतांना शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश राठोड यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करणाऱ्या मॉर्निंग वॉक ग्रुप व संजय घनघाव यांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशोधरा आश्रमशाळेच्या संगिता राठोड,सावित्रा पवार, पांडुरंग मेंडके,उध्दव सुरवसे ऐश्वर्या फडयांनी परीश्रम घेतले.

परभणीत दोन दिवसीय भक्तोत्सव अ.भा.कला महोत्सवाचे आयोजन

परभणी,/प्रतिनिधी: ज्ञानेश ध्रुपद संगीत व शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने वै. तालमणी पं. भक्तराज ज्ञानोबा भोसले यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त व ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात २५ व २६ जानेवारी रोजी भक्तोत्सव अखिल भारतीय कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून परभणी मधील पहिला बँड परफॉर्मन्स मैफिल द बँड व विदुषी आरती अंकलीकर टिकेकर यांचे शास्त्रीय गायन या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

२५ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता अ. भा. शास्त्रीय मृदंग सोलो वादन स्पर्धेस सुरुवात होणार असून सायंकाळी ६ वाजता महोत्सवाचे उद्घाटन व त्यानंतर बडोदा येथून येणारे पं. चिंतनजी उपाध्याय यांचे ध्रुपद गायन होणार आहे. त्यांना पखावज साथ पं. उद्धव बापू आपेगांवकर करणार आहेत. त्यानंतर महफिल द बँड मुंबई यांचा इंडो वेस्टर्न फ्युजन बँड चा कार्यक्रम होणार आहे, त्यात अनादी नागर, आत्मप्रकाश मिश्रा, मुकुटराज कश्यप आणि ऋतुराज भोसले हा कार्यक्रम सादर करणार आहेत.या शिबिरा साठी युवासेचे सिद्धेश्वर इंगळे पाटील, शिवसेना शाखाप्रमुख केशवराव खुडे, गावचे सरपंच भाऊराव इंगळे, उपसरपंच विठ्ठल कदम, कृष्णा कांबळे, डॉ. स्वामी, भालचंद्र नेत्रालय पाथरी, सुरेश इंगळे, शिवाजीराव इंगळे, भागवत इंगळे , करण इंगळे, हनुमान इंगळे, करण कदम, अजय कदम, सीताराम धोतरे , परमेश्वर धोतरे आदी उपस्थित होते.

आयशरच्या धडकेत तरुण गंभीर जखमी- अकोली फाट्यावरील घटना

जिंतूर,/प्रतिनिधी- जिंतूर जालना रोडवरील अकोली पाटीवर गतिरोधकावर पाठीमागून येणाऱ्या भरधाव आयशर टेम्पोने दुचाकीवरून तरुणास पाठूमागून धडक दिल्यामुळे जोगवाडा येथील तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २२ जानेवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,जिंतूर तालुक्यातील जोगवाडा येथील तरुण विश्वबर विनायक घाटूळ हा शहरातील एका एजन्सीवर कामाला असून दिवसभर काम करून जोगवाडा येथे दुचाकीवरून जात असताना जिंतूर जालना रोडवरील अकोली फाट्यावर भरधाव वेगाने असलेल्या आयशर क्र १४ ८५५५ ने पाठीमागून जोरदार धडक दिली यावेळी दुचाकीवरील तरुण रस्त्यावर पडल्यामुळे डोक्यास गंभीर मार लागला होता .

दरम्यान अपघात घडताच आयशर चालकाने चालू गाडी मधून उडी मारून पळून गेला यावेळी आयशर टेम्पो अकोली येथील चौकात लावलेला लोखंडी पोल तोडून थांबला यावेळी रस्त्यावर नागरिक नसल्यामुळे पुढील अनर्थ टळला. अकोली येथील नागरिकांनी तातडीने खाजगी रुग्णवाहिका चालक विजय राठोड यांना फोन करून घटनेची माहिती देताच सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात यांना सोबत घेऊन तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले यावेळी डॉ दीपा परिहार यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी परभणी येथे पाठवण्यात आले आहे.

खादगाव येथे आगीत बारा एकर ऊस जळून खाक

सेलू तालूक्यातील घटना,शेतक-यांचे लाखोचे नूकसान

सेलू,/प्रतिनिधी- तालूक्यातील खादगाव येथे शाँटसर्किटमूळे लागलेल्या आगीत शेतातील ऊस पिक जळून खाक झाल्याने शेतक-यांचे लाखोचे नूकसान झाल्याची घटना मंगळवार २१ रोजी दूपारी १:३० च्या दरम्यान घडली.तालूक्यातील खादगाव येथे गट क्रमांक ३२ मध्ये बाबासाहेब जगन्नाथ भाबट, जगन्नाथ दौलतराव भाबट, गोविंद मधुकर भाबट, विष्णू मधुकर भाबट,द्वारकाबाई मधुकर भाबट यांच्या उभ्या ऊस पिकाला विद्यूत वाहिनीच्या तारात शॉर्टसर्किट होवून आग लागल्याने ऊस पिक जळून खाक झाले असून या सर्व शेतकऱ्याचे दहा ते बारा लाखाचे नुकसान झाले आसल्याने या शेतक-यांवर आर्थीक संकट ओढावले आहे.सदरिल आग विझविण्यासाठी सेलू येथून नगर पालिकेचे आग्नीशामक दल पाठविण्यात आले होते.

आग आटोक्यात आणण्यासाठी दलातील कर्मचारी महेश शेरे, ऋषिकेश धापसे,सतिश अर्जूने,नितीन कापसे सह गावक-यांनी प्रयत्न केले.

सिरेहक शाह बाबा तलावाची आ. मुटकुळे, जिल्हाधिकारी यांचेकडून पाहणी

तलावाची दुरूस्ती करण्यासाठी लवकरच प्रस्ताव तयार करणार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ जानेवारी

शहरातील रिसाला बाजार भागात असलेल्या सिरेहक शाह बाबा दर्गा परिसरात असलेल्या प्राचीन तलावाची पाहणी गुरूवार दि २३ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली. यावेळी तलावातील पाण्याचा धोका पाहता लवकरच तलाव दुरूस्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली.

सिरेहक शाह बाबा तलाव हा शहरातील रिसाला बाजार परिसरात आहे. हा तलाव शहरापासून उंचावर असल्यामुळे या तलावातील पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे. मागील पावसाळ्यात या तलावाचे पाणी बंधारा फुटल्यामुळे काही प्रमाणात शहरात शिरल्यामुळे जिल्हा परिषद वसाहत, बांगर नगर आदी भागात शिरले होते. या परिसरातील काही दुकानांचे आणि घराचे नुकसानही झाले होते. या तलावाचे पाणी वाढल्यास शहराला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तलावाच्या बाजुलाच समाज कल्याण विभागाचे कार्यालय, मुलींचे वसतीगृह, शासकीय रूग्णालय, रिसाला बाजार भाग आदी भाग आहे. त्यामुळे या तलावाची डागडुजी आणि दुरूस्ती करणे तसेच तलावातील गाळ काढणे देखील आवश्यक आहे.

या सर्व बाबींचा विचार करता जिल्हाधिकारी अभिनव गोयल, भाजपचे हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपअभियंता प्रतीक नाईक, अभियंता काकडे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, जलसंपदा विभागाचे अभियंता खिराडे, भाजपचे गोवर्धन वीरकुंवर, मोतीराम इंगोले, संजय कावडे, हमीद प्यारेवाले आदींनी या तलावाची पाहणी केली.

यावेळी तलाव परिसरात असलेला बंधारा अत्यंत खराब झाला असून त्याची दुरूस्ती करण्याची गरज आहे. तसेच तलावातील गाळ काढण्याचीही गरज आहे. यावेळी शहराच्या आराखड्यानुसार हा तलावाची पाहणी करीत तलाव सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी आ. मुटकुळे म्हणाले की, हा तलाव अतिशय प्राचीन असून शहराच्या वर असल्यामुळे याचे पाणी शहरात न जाण्यासाठी लवकरच उपाययोजना करण्यात येणार आहे तसेच गाळमुक्त तलाव योजनेंतर्गत या तलावातील गाळ काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी गोयल यांच्या नेतृत्वात तलावाची पाहणी केली असून हा तलाव पशुसंवर्धन विभागाच्या जागेत असून जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांनीही तलावाची पाहणी केली असून लवकरच याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी गोयल शासनाकडे पाठविणार असून आम्ही तलावाच्या कामासाठी जास्तीत जास्त निधी शासनाकडून मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत.

यावेळी जिल्हाधिकारी गोयल म्हणाले की, आम्ही अधिकाऱ्यासोबत तलावाची पाहणी केली होती. येथील बांध मागील पावसाळ्यात फुटला असून त्याची डागडुजी करणार आहोत. तसेच तलावाचा फायदा भविष्यात नागरिकांसाठी कसा होईल याबाबत उपाययोजना करणार आहोत.

हैद्राबाद मुक्तीचा स्वतंत्र अध्याय: मराठवाडा केसरी माणिकराव देशमुख टाकळगव्हाणकर

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ जानेवारी



हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्रामचे स्वातंत्र्यसैनिक आदरणीय श्री माणिकरावजी देशमुख टाकळगव्हाणकर यांचा शताब्दी पूर्व वर्ष गौरव समारंभ होणार आहे.फक्त स्वातंत्र्यसैनिक श्री माणिकराव देशमुख टाकळगव्हाणकर शताब्दी गौरव समितीने आयोजित केलेला हा बहारदार कार्यक्रम म्हणजे स्वातंत्र्य संग्रामप्रेमी तरुण पिढीसाठी जणू मोठा उत्सवच आहे.

दरम्यान, हॉटेल शांती चे उदघाटन देखील आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब (भारताचे माजी कृषी मंत्री) यांच्या शुभ हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार जयंत पाटील. अध्यक्ष राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र ,(शरद पवार) आहेत. आयोजक आणि निमंत्रित समिती. अधिवक्ता: सतीश देशमुख. डॉ पंडितराव देशमुख. श्री.दिलीपराव चव्हाण अध्यक्ष नगर पालिका हिंगोली.

हा खरोखरच सुवर्ण क्षण आहे.हिंगोली हा जुन्या परभणी जिल्ह्याचा एक भाग आहे. शिवशाही काळात हिंगोली जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले. निजाम संस्थानातील जुना परभणी उस्मानाबाद जिल्हा हा अन्यायाविरुद्ध उठाव करणारा क्रांतिकारी जिल्हा होता. विशेषत: निजाम संस्थानातील मराठवाड्याच्या भूमीच्या नशिबी स्वातंत्र्य खूप उशिरा आले. १९४७ मध्ये जेव्हा संपूर्ण भारत १४ ऑगस्टच्या मध्यरात्री भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करत होता तेव्हा जगाने लोकशाही राष्ट्र भारताचा उदय होत असल्याचे पाहिले.

पण हैदराबाद संस्थानात भारतातील दख्खनचे पठार १२९६ ते १७ सप्टेंबर १९४८ या काळात सुलतानशाहीला तोंड देत होते, आपल्या पूर्वजांनी गुलामगिरीचा कसा सामना केला याची कल्पना करता येते. हिंगोली तालुक्याच्या काही भागात क्रांतीची भूमी असलेल्या निजाम संस्थानाच्या शेवटच्या भूमीला आंतरराष्ट्रीय सीमा असल्याने आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क कार्यालय म्हणजे करोडदगिरी नाका होता.या भूमीला प्रदीर्घ काळ गुलामगिरीचा सामना करावा लागला आणि या भागाला कोणीही मुक्त करण्याचा प्रयत्न केला नाही हे ऐतिहासिक सत्य स्वीकारले पाहिजे. परंतु त्या युद्धात रझाकार विरुद्धच्या लढाईची मुख्य उर्जा खास शेतकरी कुटुंबे होती हिंगोलीकर भारतासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यात कोणापेक्षाही पुढे होता. कळमनुरी हिंगोली सेनगाव औंढा वसमत परभणी जिंतूर परतुर सेलू गंगाखेड वारंगा आखाडा बाळापूर या भागातील तरुण स्वातंत्र्यसैनिकांनी वयस्कर स्वातंत्र्यसैनिकांच्या मार्गदर्शनाखाली बहिर्जी शिंदेंसारखे हुतात्मा ही तयार झाले.

मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्यसैनिक ही उपाधी मिळण्यासाठी स्वातंत्र्यानंतर तब्बल ३५ वर्ष वाट पाहावी लागली स्वातंत्र्याच्या ३५ वर्षानंतर त्यांना स्वातंत्र्यसैनिकांचा दर्जा देण्यात आला. कासिम रिझवी आणि त्याचे रजाकार याच्या अत्याचाराचे पाढे बीबीसीच्या आर्काईड पासून आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये आजही शिकवले जातात. परंतु हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा साधा धडा ही महाराष्ट्राच्या अभ्यासक्रमात स्वातंत्र्य म्हणजेच १९६० पासून आतापर्यंत कधीही सामील करण्यात आला नाही. मुळात हैदराबाद मुक्तिसंग्राम हा हिंदू मुसलमान असा वाद नव्हताच हा वाद राजा आणि प्रजा असाही नव्हता तर हा वाद होता हैदराबादच्या निजामाने भारतात राहायचे की स्वतंत्र देश म्हणून जगायचे आणि मग त्याच्या डोक्यात आली ती कल्पना स्वतंत्र उस्मानिस्तान निर्माण करायचा त्यासाठी त्यांनी लातूरच्या कट्टर धार्मिक वकिलाला आपल्या हाताशी धरले आणि धार्मिक कट्टरतेच्या नावाखाली अफगाणिस्तानातील रोहिले हैदराबाद संस्थानाचा भूगोल हा सामाजिक दृष्ट्या बदलण्यासाठी रोहिले रजाकार सैन्य तयार केले त्यामुळे इंग्रजांना ते खाजगी सैन्य असल्यामुळे ते धार्मिक काम करतात असे वाटले परंतु प्रत्यक्षात मात्र ते निजामशाहीच्या वर्दीमध्ये राजाच्या इच्छेच्या माध्यमातून आदेशातून जनतेची गळचेपी करत होते उघड हत्या करत होते लूटपाट करत होते जेणेकरून भीतीपोटी लोकांनी स्थलांतरित व्हावे आणि हैदराबाद संस्थांतून पळून जावे अन्यथा मरावे दुसरा पर्याय शिल्लक नव्हता आणि मग माय बहिणींच्या अब्रू वाचवण्यासाठी हिंगोली जिल्ह्याच्या सीमा वरती भागामध्ये जे युद्ध झाले ते फार भयंकर होते निजाम दप्तरी त्याच्या नोंदी आहे परंतु भाषेचा अभाव असल्यामुळे मराठी माणूस ते वाचू शकत नाही फसी फारसी उर्दू ही आता दहावीच लोकांपेक्षा जास्त लोकांना वाचता लिहिता येत नाही त्यामुळे स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास बाहेर येणे नाही.

परंतु जे महान स्वातंत्र्यसैनिक आपल्यामध्ये हयात आहे त्यांची आपणास आयुष्याची यशस्वी सुवर्णमयाशी १०० वर्षाची लढाई पूर्ण केली. हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्राम या स्वातंत्र्यसंग्रामातील महान स्वातंत्र्य सेनानी मराठवाडा केसरी माननीय माणिकरावजी देशमुख टाकळगव्हाणकर हे आपल्यासमोर साक्षात पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडचा प्रवास त्याचा जिवंत ऐतिहासिक दाखला आहे या पिढीने हा लढा दिला नसता आणि जर निजामाच्या त्या प्रस्तावावर त्यांनी सही केली असती तर आज ठरल्याप्रमाणे हैदराबाद म्हणजेच उस्मानीस्थान या देशाचे पहिले प्रधानमंत्री हिंगोली चे महान सुपुत्र बाबासाहेब देशमुख सवनेकर राहिले असते... परंतु त्यांनी स्पष्ट शब्दात ते नकारले धन्य ती माणसे आणि धन्य त्यांची राष्ट्रनिष्ठा.

निजामाने तसा प्रस्तावच लेखी स्वरूपात दिला होता थोर स्वातंत्र्य सेनानी दिपाजी पाटील साहेब, माजी खासदार वाघमारे साहेब, माजी आमदार व महान स्वतंत्र सेनानी कम्युनिस्ट विचारणाचे कडवे पाईक कॉम्रेड विठ्ठलराव नाईक चिंचोली कर, वसमत चे थोर स्वातंत्र्य सेनानी व महात्मा गांधींचे सहकारी सर्वोदय नेते तसेच विनोबा भावे यांचे सहकारी आदरणीय नंदाप्रसादजी अग्रवाल साहेब हे याच जिल्ह्याचे.

स्वातंत्र्यसंग्रामाला बळ मिळाले ते बहुजन समाजातील सहभागाने त्यातल्या त्यात मराठा समाजाने रजाकाराच्या अत्याचाराला कंटाळून अत्याचाराच्या विरुद्ध प्रतिकार करायला सुरुवात केली आणि त्या महान योद्धांचा प्रतिकार हा आक्रमणापेक्षाही तीव्र होता. कुठल्या जातीचा उल्लेख करायचा म्हणून नाही परंतु जगातल्या कुठल्याही भूभागावर शांतता नोंदवायचे असेल तर तुम्हाला त्या भूभागावरील बहुसंख्य जनतेला त्यांच्या भावनेला समजून घ्यावे लागते, तरच इतिहासात घडलेल्या प्रत्येक घटनेचे कोडे आपल्या नजरेतून सुटत नाहीत.

आज आदरणीय माजी कृषी केंद्रीय मंत्री तथा देशाचे ज्येष्ठ नेते श्री शरदचंद्रजी पवार साहेबांच्या हस्ते या महान विभूतींचा सत्कार व्हावा आणि शंभरी पार करणाऱ्या महान योद्धा ला शुभेच्छा देण्यासाठी आपल्या थोडा मोठ्यांची उपस्थिती हा दुग्ध शर्करा योग आहे.

हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या जीवित्ताची संपत्तीची होळी केली आणि मग भारत सरकारला स्वातंत्र्याच्या तेरा महिन्यानंतर लक्षात आले की हैदराबाद भारतात विलीन होणार नाही ते स्वतंत्र राष्ट्र होणार आहे तेव्हा हैदराबाद संस्थानावर मिलिटरी कारवाई करण्यात आली त्या कारवाईचे नाव ठेवण्यात आले ऑपरेशन पोलो त्याला आमच्याकडे पोलीस क्शन असे म्हणतात परंतु लक्षात घ्या की पोलीस क्शन नव्हती ती मिलिटरी क्शन होती. यावरून याचे गांभीर्य आपल्या लक्षात यावे ही स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सैन्य दल पाठवावे लागले इथल्या जनतेने काय भोगले असेल आणि मग १७ सप्टेंबर १९४८ ला निजाम आणि भारत सरकार यांच्यामध्ये करार झाला आणि निजाम शरण आला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंद भाई श्राफ, विजेंद्र काबराजी, एडवोकेट चंद्रशेखर दादा बाजपाई विनायकराव चारठाणकर, विडोळकर, शंकररावजी चव्हाण ,अशा सर्व अगणित हजारो महान आत्म्यांचे सहभाग त्याग आज आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकले .त्या लढ्याचे थोर स्वातंत्र्यसैनिकापैकी एक, परम आदरणीय माणिकरावजी देशमुख टाकळगव्हाणकर साहेब यांना आज आपण पाहू शकायलो साहेबांच्या माध्यमातून आपल्याला स्वातंत्र्यसंग्रामातील हजारो स्वातंत्र्यसैनिकांचे दर्शन घडत आहे. त्यागाचे दर्शन घडत आहे त्या सर्वांना साष्टांग दंडवत.

आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब व सर्वपक्षीय सर्व मंत्री महोदय सन्माननीय आमदार सन्माननीय खासदार या सर्व गणमान्य व्यक्तींचे हिंगोली शहरात मनःपूर्वक स्वागत हा सोहळा पाहणे अविस्मरणीय क्षण असेल स्वातंत्र्यसंग्रामातील एका महान स्वातंत्र्यसैनिकांचा शंभर वर्ष पूर्ततेचा हा सोहळा पाहणे अद्भुत अनुभव आहे. यासाठी या सर्व महान व्यक्तींचे, सहकारी यांचे या कार्यक्रमासाठी मनःपूर्वक स्वागत.

लेखक: सतीश सातोनकर, नानल पेठ परभणी.

जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
वसमत, २३ जानेवारी

जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री विद्यालय येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री विद्यालयात मागच्या दहा दिवसापासून चालू असलेल्या सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा विद्यार्थ्यांनासाठी चालू होते. या कार्यशाळेप्रसंगी तहसीलदार सौ. शारदा दळवी उपस्थित होत्या. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक पांडुरंग चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. या समारोप प्रसंगी सौ शारदा दळवी यांनी कौतुक केले.पुढे बोलताना जीवनात सुंदर हस्ताक्षराला खूप महत्व असते. मी आजपर्यंत खूप साऱ्या शाळा पाहिल्या पण अशी शाळा मला पाहण्याचा कधीच योग आला नाही परंतु आज ज्यावेळी शाळेत आले त्यावेळी मला खूप छान वाटले. मुलांनी दहा दिवसात जी हस्ताक्षरात जी प्रगती केली ती खरच खूप चांगल्या प्रकारची आहे. शाळेमध्ये चालू असलेला क्रीडा सप्ताह पाहून माझ्यातील खेळाडू जागा झाला. शाळेतील खेळाडूंचा खेळ, त्यांचा खेळ पाहून मला सुध्दा खेळ खेळण्याचा मोह आवरला नाही. मी त्यांच्यात जाऊन खेळाचा मनमुराद आनंद घेतला. त्याच बरोबर जेव्हा मी कॉम्प्युटर लॅबमध्ये गेली तेव्हा मुलांनी केलेले रोबोटिक्स आधारित प्रात्यक्षिक पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. मला विश्वास बसत नव्हता की मी वसमत सारख्या छोट्याशा शहरात एवढे दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. हे पाहून खूप आनंद झाला, असे त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

त्यानंतर कार्यशाळेचे मार्गदर्शक पांडुरंग चोपडे यांनी आजपर्यंत केलेल्या कार्यशाळेचा वृत्तांत मुलांना सांगितला. लिहीत असताना कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे यावर सुद्धा त्यांनी सुंदर असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संदीप चाटोरीकर व सूत्रसंचालन सईम पिराजी यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

संक्षिप्त वृत्त

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ कार्यक्रम

हिंगोली- राष्ट्रीय मतदार दिन दि. २५ जानेवारी, २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवतरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. तथापि, दि. २५ जानेवारी रोजी शनिवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे दि. २४ जानेवारी, २०२५ रोजी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम दि. २४ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

शिरडशहापूर येथे रक्तदान शिबीर

औंढा नागनाथ- शिरडशहापुर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच हिंगोली जिल्हा केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेश शिंदे, सचिव संतोष बाहेती, कोषाध्यक्ष गणेश गरड शिबीराचे उद्घाटन डॉ.हाके यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यम हाके यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून दिलीप साखरे, विजय धामणे, मुदनर, डॉ. विष्णू बोंगाणे, धनंजय घोरपडे, डॉ. खराटे, वसंत चिल्केवार, डॉ. नागपूरकर, डॉ माने, शुभम हाके, रूपाली साखरे यांची उपस्थिती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

सापटगाव येथे दोन दिवस जंगी शंकरपट

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील खंडोबा यात्रेनिमित्त सापटगाव येथे दोन दिवस जंगी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले असून या शंकर पटाची जय्यत तयारी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. शंकरपटासाठी परिसरातील बैलजोड्या येत असून दि २५ आणि २६ जानेवारीला होणाऱ्या शंकरपटात विजयी बैलजोडीला प्रथम पारितोषिक ४१ हजार, द्वितीय पारितोषिक ३१ हजार, तृतीय पारितोषिक २१ हजार असे घोषित करण्यात आले आहेत.

आदर्श महाविद्यालयात भाजप सदस्य नोंदणी अभियानानिमित्त विशेष शिबीर

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ जानेवारी

शहर भाजपा तर्फे हिंगोली शहरात आदर्श महाविद्यालय परिसरात भाजपा सदस्य नोंदणी अभियान २०२४ अंतर्गत एक विशेष सदस्य नोंदणी शिबिर घेण्यात आले.

भारतीय जनता पार्टीच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी आणि भाजपाचे कार्य पाहता या सुवर्णपर्वाचे आपण सर्व भागीदार व्हावे यासाठी आपण सर्वांनी भाजपाचे सदस्य व्हावे असे आवाहन शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा यांनी केले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे विकास कार्य पाहता जवळपास ११०० नवी सदस्य नोंदणी झाली. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आमदार रामराव वडकुते, शंभूसिंग गेहिलोत, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा, दुर्गादास साकळे, महिला शहराध्यक्ष सौ.अलका लोखंडे, प्रशांत सोनी, सदाशिव सूर्यतळ, राजेश अग्रवाल, रजनीश पुरोहित, गुड्डू देवकते, सौ. रजनी पाटील, सौ ज्योती वाघमारे, सौ सुमन थोरात, करण भन्साळी, आशिष शर्मा, आशिष जयस्वाल, सुनील जामकर, संजय कावडे आदींची उपस्थिती होती.

व्हॉईस ऑफ मिडीयाच्या जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर उंडाळ यांची निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २३ जानेवारी

व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर उंडाळ तर विभागीय सरचिटणीसपदी रमेश कदम यांची निवड निवड करण्यात आली.

व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम यांचा कार्यकाळ संपल्याने नूतन जिल्हाध्यक्ष निवडीसाठी येथील शासकीय विश्रामगृहात २२ जानेवारी रोजी बैठकीचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे सस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी व्हिडीओ कॉलद्वारे व्हाईस ऑफ मीडिया संघटनेची आगामी काळातील दिशा व कामकाजाची माहिती दिली. त्यानंतर नूतन जिल्हाध्यक्ष निवडीसंदर्भात माहिती देवून उपस्थित सदस्यांचे मत जाणून घेतले. यावेळी ज्ञानेश्वर उंडाळ यांची जिल्हाध्यक्षपदी तर रमेश कदम यांची विभागीय सरचिटणीसपदी सर्वानुमते निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी रमेश चेंडके, माधव दीपके, गजानन लोढे, गजानन वाणी, श्रीधर वाळवटे, नंदकिशोर कांबळे, चंद्रमुनी बलखंडे, सचिन कवडे, विजय गुंडेकर, शितळे, जाधव, रंगनाथ नरवाडे यांची उपस्थिती होती.

हिंगोली- कोळसा येथील यात्रेनिमित्त सापटगाव येथे जंगी शंकरटाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, भास्करराव बेंगाळ, ग्रामस्थ दिसत आहेत. छाया- लखन यादव

थोडक्यात

१००८ श्री स्वामी चरित्र सारामृत सामुहिक पाठाची सेवा अक्कलकोट येथे संपन्न

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.२२ जानेवारी

चनई येथील श्री गुरु पादुका मठाच्या वतीने अक्कलकोट येथे सामुहिक श्री स्वामी चरित्र सारामृत १००८ पाठाची सेवा दि.१८ व १९ जानेवारी रोजी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ विश्रामधाम वळसंग येथे पार पडली.या सामुहिक सेवेसाठअंबाजोगाई, चनई, धानोरा, मोटेगांव, करमाळा, केज, होळ, बार्शी, कळंब, अकलूज, माळशिरस, सावदा, सोलापूर, बनसारोळा, या ठिकाणाहुन ६५० सेवेकरी आले होते.या ठिकाणी १०५८ पाठ पूर्ण झाले.रविवारी स्वामी चरित्र सारामृताचा याग संपन्न झाला. महाप्रसादाने यांची पारायणाची सांगता करण्यात आली.

या सेवेच्या यशस्वीतेसाठी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाशीर्वादाने परमपूज्य गुरूवर्य श्री.समीर(दादा) भास्करे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवीण बासटवार,डॉ.अभिजीत चव्हाण,विजय चव्हाण, बालाजी उमनवार, अनिकेत पवार, सौरभ कासवेकर, भगवान सवूळकर,रोहन गडदे, श्रध्दा भास्करे,संगिता सौदागर, सिता गडदे,पुष्पलता कराड,पुष्पा बोऱ्हाटे,पल्लवी धोकटे,मिना कदम, जान्हवी पतंगे,सागर महामुनी,अश्विनी महामुनी यांनी परिश्रम घेतले.

मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे शेळ्या व मेंढ्यांचे पी पी आर लसीकरण संपन्न

तभा वृत्तसेवा

बीड दि.२२ जानेवारी

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर* महाविद्यालयाच्या राष्ट्रीय योजना विभाग व पशुवैद्यकीय दवाखाना नवगण राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक व युवती निवासी शिबिरा दरम्यान दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी बकरी व मेंढी प्लेग प्रतिबंध लसीचे लहान रूमिनन्स चा रोग लसीकरण आयोजित करण्यात आले होते. या लसीकरणांमध्ये डॉक्टर प्रदीप आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय तज्ञ डॉक्टरांची टीम शिबिर स्थळी दाखल झाली होती या टीम मध्ये शेळ्या व मेंढ्यांना लसीकरणाचे काम श्रीमती मंगला ढगे, श्री वाघ श्री सोनार, श्री बनकर, डॉक्टर राऊत, श्री केतके परमेश्वर, महादेव सानप, नारायण सोनार, श्रीकांत बहिर, विशाल तांदळे विवेक दराडे, सुरेश पवार, या सर्वांनी शेळ्या मेंढ्यांच्या या प्लेग प्रतिबंध लसीकरणाचे काम केले.मौजे वंजारवाडी गावातील मेंढपाळ व शेळी पालन करणारे शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते एकाच दिवशी सुमारे १७२ शेळ्या मेंढ्यांच्या संसर्गजन्य आजारापासून मुक्त होण्याकरता सर्व डॉक्टर्स सर्वस्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.या गावातील श्री दगडू तांदळे, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक संजय काळे डॉक्टर सुहास जोशी, स्वयंसेवक पवन कपाळे अनंत चव्हाण, निखिल वाघमारे, अजय शिंदे,गोविंद फासे, अभिजीत वडमारे, इमरान कुरेशी उपस्थित होते.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल विवाह थांबणे आवश्यक

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ जानेवारी

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे बाल विवाह प्रतिबंध कायदे विषयक माहिती देणारा कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी अँड.अरविंद पाटील यांनी बाल प्रतिबंध कायदे विषयक माहिती दिली.

प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर चालू आहे. दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंध रॅली काढण्यात आली बालविवाह अपराध है, प्राधान्य द्या शिक्षणाला नकार द्या बालविवाहाला बालविवाहाचा करू निषेध यशस्वी भविष्याचा होऊ वेध, सर्वांनी आता ठरवूया बालविवाहाला हरवू या अशा अनेक घोषणांनी विद्यार्थ्यांनी घरी आली मध्ये घोषणा दिल्या. रॅली निघण्यापूर्वी बीड येथील प्रसिद्ध वकील श्री अरविंद पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यावर मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले प्रत्येक आई-वडिलांनी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्यास ते विवाह करण्यास पात्र ठरतील या वयाच्या आधी बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे बालविवाहास प्रत्येक नागरिकांनी विरोध केला पाहिजे बालविवाह करणे म्हणजे अपराध आहे प्रथम प्रत्येक नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षणास प्राधान्य द्यावे व बालविवाह पासून रोखणे ही काळाची गरज आहे. बालविवाहाच्या बाबतीत १०९८ ही हेल्पलाइन नंबर असून या नंबर वरती नागरिक फोन करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बी. डी. नागरगोजे होते. श्री नागरगोजे सर म्हणाले प्रत्येकाने प्रथम शिक्षणाला प्राधान्य देऊन प्रत्येक कुटुंबास प्रतिबंध करण्यास सतर्क करणे ही काळाची गरज आहे बालविवाहाचा गुन्हा करण्याआधीच बालविवाह प्रतिबंध साक्षरता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेने राबविले हा एक स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम आहे.या फेरीमध्ये श्रीमती एस बी नागरगोजे, श्री शिंदे सर व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथील सर्व शिक्षक मातोश्री विद्यालयातील सर्व विद्यार्थी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ सुहास जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अजय शिंदे, पवन कपाळे, अभिजीत वडमारे, निखिल वाघमारे, अनंता चव्हाण, इमरान कुरेशी, प्रसाद पांडे, गावातील नागरिक श्री दगडू तांदळे, श्री गायकवाड, आदी नागरिक उपस्थित होते.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल विवाह थांबणे आवश्यक-ॲड.पाटील

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ जानेवारी

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे बाल विवाह प्रतिबंध कायदे विषयक माहिती देणारा कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी अँड.अरविंद पाटील यांनी बाल प्रतिबंध कायदे विषयक माहिती दिली.

प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर चालू आहे. दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंध रॅली काढण्यात आली बालविवाह अपराध है, प्राधान्य द्या शिक्षणाला नकार द्या बालविवाहाला बालविवाहाचा करू निषेध यशस्वी भविष्याचा होऊ वेध, सर्वांनी आता ठरवूया बालविवाहाला हरवू या अशा अनेक घोषणांनी विद्यार्थ्यांनी घरी आली मध्ये घोषणा दिल्या. रॅली निघण्यापूर्वी बीड येथील प्रसिद्ध वकील श्री अरविंद पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यावर मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले प्रत्येक आई-वडिलांनी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्यास ते विवाह करण्यास पात्र ठरतील या वयाच्या आधी बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे बालविवाहास प्रत्येक नागरिकांनी विरोध केला पाहिजे बालविवाह करणे म्हणजे अपराध आहे प्रथम प्रत्येक नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षणास प्राधान्य द्यावे व बालविवाह पासून रोखणे ही काळाची गरज आहे. बालविवाहाच्या बाबतीत १०९८ ही हेल्पलाइन नंबर असून या नंबर वरती नागरिक फोन करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बी. डी. नागरगोजे होते. श्री नागरगोजे सर म्हणाले प्रत्येकाने प्रथम शिक्षणाला प्राधान्य देऊन प्रत्येक कुटुंबास प्रतिबंध करण्यास सतर्क करणे ही काळाची गरज आहे बालविवाहाचा गुन्हा करण्याआधीच बालविवाह प्रतिबंध साक्षरता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेने राबविले हा एक स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम आहे.या फेरीमध्ये श्रीमती एस बी नागरगोजे, श्री शिंदे सर व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथील सर्व शिक्षक मातोश्री विद्यालयातील सर्व विद्यार्थी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ सुहास जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अजय शिंदे, पवन कपाळे, अभिजीत वडमारे, निखिल वाघमारे, अनंता चव्हाण, इमरान कुरेशी, प्रसाद पांडे, गावातील नागरिक श्री दगडू तांदळे, श्री गायकवाड, आदी नागरिक उपस्थित होते.

जन शिक्षण संस्थान बीड द्वारा तृतीय पंथीयांना व्यवसायिक प्रशिक्षण नियोजन बैठक

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ जानेवारी

दीनदयाल शोध संस्थान,जन शिक्षण संस्थान बीड आणि सेवा भारती देवगिरी प्रांत यांच्या सहयोगाने तृतीयपंथी समाजासाठी व्यावसायिक कौशल्य विषयक प्रशिक्षण नियोजन बैठक दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आली. बैठकीमध्ये कौशल्य प्रशिक्षण याबाबत चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रोहित दोशी यांनी केले.यावेळी जन शिक्षण संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी जन शिक्षण संस्थानची माहिती सांगून प्रशिक्षणानंतर तुमचे उत्पन्न वाढवून सन्मानाने समाजामध्ये वावरता येईल असे सांगितले. अर्पिता भिसे (तृतीयपंथी)यांनी तृतीय पंथीयांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष द्यावे, असे मत मांडताना शिक्षण सगळ्यांनाच आवडते असे नाही काहीजण व्यवसाय करू इच्छितात ज्यांना व्यवसाय करायचा आहे त्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे असे मत मांडले.

वडवणी तालुक्यात सिताफळाचे उत्पन्न भरपूर आहे तर तेथील लोकांसाठी सिताफळ प्रक्रिया उद्योग सुरू करता येईल का

तसेच असिस्टंट ड्रेस मेकर हे प्रशिक्षण दिले तर शालेय युनिफॉर्म,इतर विभागाचे युनिफॉर्म, साडी पेटीकोट, महाराष्ट्रीयन गोधडी (रजई) हे त्यांना शिकवता येईल. असे संचालक श्री गंगाधर जी देशमुख म्हणाले. हा विषय सर्वांनाच आवडल्याने यावर विचार करून नियोजन करावे असे उपस्थित मान्यवरांनी सुचवले.या बैठकीसाठी नांदेड येथील फरीदा गुरू व त्यांचे सहकारी, अमरदीप गोधने संभाजीनगर येथील अर्पिता भिसे, जन शिक्षण संस्थान बीडच्या उपाध्यक्ष डॉ. सत्यभामा चोले , सेवा भारतीचे श्री रावसाहेब जी कुलकर्णी, गिरीश जी जोशी, डॉ. सुभाष जोशी,महेश कुलकर्णी,तारकेश्वर गिते , रोहित दुशी,धान फाउंडेशनचे श्री मुकुंद भुसारे व जन शिक्षण संस्थान बीडचे अधिकारी उपस्थित होते.

बीडची लेक वैभवी टाकणखार प्रजासत्ताक दिनी राजपथावर सामुहिक नृत्य

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ जानेवारी

प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी लाल किल्ला दिल्ली येथे राजपथावर महाराष्ट्राची लोककला सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे वैभवी कैलास टाकणखारची निवड करण्यात आली आहे. भारतातून २९ राज्यातील ५००० विद्यार्थी आपल्या राज्यातील लोकनृत्य सादर करणार आहेत.महाराष्ट्रातील ४० कलाकारांचा संच महाराष्ट्राची लोकधारा कोकणातील कोळी नृत्य सादर करणार आहेत.

अथर्व वेद परंपरा कला मंच रत्नागिरी महाराष्ट्रचे संस्थापक पडवळ तसेच लोकनृत्य दिग्दर्शक अभ्यासक शेख.जावेद यांच्या मार्फत निवड करण्यात आली.यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे होणाऱ्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात आपल्या कौशल्याचा ठसा उमठवणार आहे.वैभवी कैलास टाकणखार ही माजलगांव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिक्षण घेत आहे वैभवीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये नृत्याचे धडे घेतले आहेत.महाराष्ट्रातील विविध स्पर्धेत पारितोषिक पटकावले आहेत. भरतनाटयम, फोक, बालीवुड, हिपहाप अशा विविध नृत्यामध्ये धडे घेतले आहेत वैभवीने आतापर्यंत ३६४ पारितोषिक पटकावले असून त्या राज्यस्तरिय, देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडली आहे.तसेच टिव्ही शो वरील कार्यक्रमात इ. टिव्ही मराठी, झी मराठी, डान्स महाराष्ट्र डान्स, सह्याद्री वाहिनी, स्ट्रार प्रवाह, दुरदर्शन अशा विविध रियालटी शो मध्ये सहभाग घेतला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साध्य होतो-तहसीलदार रुईकर

सुंदराराव सोळंके महाविद्यालयाच्या रासेयोच्या शिबिराचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ जानेवारी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिशा मिळते.शिबिराच्या माध्यमातून विविध कृतिशील उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साध्य होतो असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन करताना तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लऊळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय विशेष वार्षिक निवासी शिबिर दि.२३ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. शिबाराचे उद्घाटन तहसीलदार संतोष रुईकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर , प्राचार्य डॉ.जी. के. सानप,सरपंच लक्ष्मण सरवदे,उपसरपंच गणेश शिंदे, मनोज सदावर्ते,मुख्याध्यापक बाजीराव राठोड,कार्यक्रमाधिकारी प्रा.उमेश राठोड,डॉ.बीलास काळे, प्रा. ओ. एच. सारगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना तहसीलदार संतोष रुईकर म्हणाले की, पर्यावरण, स्वच्छता, डिजिटल साक्षरता आदी बाबतीत जनजागरण करण्याची उत्तम संधी आहे. विद्यार्थ्यांनी सात दिवसांमध्ये उपक्रमशील कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के.सानप म्हणाले की, महाविद्यालय सतत ज्ञानदानाबरोबरच सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ करत आहे.अध्यक्षीय समारोप बाळासाहेब शिंदे यांनी केला, याकार्यक्रमाचे प्रास्तावित कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी केले. सूत्रसंचालन कु.नंदनी गर्गे हिने केले तर आभार प्रा. बिलास काळे यांनी मानले.यावेळी स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

कौशल्याधिष्ठीत शिक्षण काळाची गरज-प्रो.डॉ.सुधाकर शेंडगे

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ जानेवारी

सद्यस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून नौकरी मिळत नाही ही गंभीर बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत व्यावसायिक कौशल्यावर आधारीत शिक्षण घेणे काळजी गरज आहे असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले.

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे होते तर कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. सुधाकर शेंडगे म्हणाले की, शिक्षण हे वर्गात नसते तर खरे शिक्षण वर्गाच्या बाहेर विविध राबवल्या जाणाऱ्या उपक्रमात आहे. अनुभवातून शिक्षण मिळत असते. शिक्षणातून सदाचारी माणूस घडला पाहिजे.आपला सदाचारिपणाच ही आपली ओळख असते.विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तसेच त्यांच्यामध्ये असणाऱ्या विविध कौशल्यांचा विकास करण्याचे काम आजीवन व शिक्षण विस्तार विभाग करत असल्याचे ते म्हणाले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ एम.ए. कव्हळे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.प्रास्ताविक प्रा.बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरुण पेंटावार यांनी केले तर आभार प्रा.सुदर्शन स्वामी यांनी मानले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या माजलगावच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमता पुरस्काराने गौरव

शरदचंद्रजी पवार,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ जानेवारी

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे मार्फत दिला जाणारा २०२३-२४ यावर्षीचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर पूर्व विभाग)द्वितीय पारितोषिक छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड यांना मा.शरदचंद्रजी पवार व मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

हा पुरस्कार कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप व कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी, सचिव, चीफ इंजिनिअर, चीफ अकाऊंटंट यांनी स्वीकारला.काल पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिटट्यूट यांच्यावतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मागील २०२३-२४ या वर्षाच्या तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षमता मधील उसाचा तंतुमय निर्देशांक ८४.१०%, रिड्यूस्ड मिल एक्सट्रॅक्शन ९५.६५ , प्रायमरी एक्स्ट्रक्शन ७३.३०%, बगॅस बचत ११.५१%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर ४०.६०%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या विजेचा वापर २६.४० किलो वॅट प्रति टन ऊस, गाळप क्षमतेचा वापर ११२.४७%, देखभाल दुरुस्तीसाठी एकूण खर्च रुपये ११५ प्रति टन ऊस, गाळपाचे बंद कालावधीचे प्रमाण १.०७% बगॅस मधून व्येय होणाऱ्या साखरेचे प्रमाण ०.५६% मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या मध्ये घट ०.४८१% असे कार्यक्षमता वैशिष्ट्य कारखान्याने केलेली असून यामुळे छत्रपती कारखान्यास मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन कारखान्यास गौरविण्यात आले या पुरस्कारासाठी सर्व स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप,व्हा.चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

सोळंके साखर कारखान्याकडून ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात वर्ग-चेअरमन विरेंद्र सोळंके

तभा वृत्तसेवा
तेलगाव दि.२२ जानेवारी

लोकनेते सुंदरावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या चार जानेवारी अखेर ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात जमा केली असल्याची माहिती चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी दिली.

यासंदर्भात चेअरमन विरेंद्र दादा सोळंके म्हणाले की,लोकनेते सुंदरावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४२५ दि.१३ड१२ड२०२४ ते दि.४ड०१ड२०२५ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाचे पहिल्या हप्त्याची रक्कम तुर्त प्रति टन २४०० रू.प्रमाणे संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बॅक खात्यात दि.२२ड०१ड२०२५ रोजी वर्ग केली.कारखान्याचा सन २०२४२५ चा ऊस गाळप हंगाम सध्या यशस्वीपणे चालु असुन, दि.२२ड०१ड२०२५ अखेर एकुण ६० गाळप दिवसांमध्ये २७७००० मे टन ऊसाचे गाळप करुन सरासरी ९६६% साखर उताऱ्याने १२४००० क्विंटल साखरचे उत्पादन घेतले.याबरोबरच ६६७१३१० लिटर इथेनॉलचे उत्पादन घेवुन १२९६२६०० युनिट विजेची निर्मिती केली.असे सांगून यापुर्वी चालु गळीत हंगामातील दि.२४ड११ड२०२४ ते दि.१२ड१२ड२०२४ या कालावधीत गाळप झालेल्या ऊस बीलासाठी डव्हान्स हप्त्याची रक्कम २७०० रू.प्रति टन प्रमाणे ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग केली असुन, यापुढील कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई यांनी ऊस बीलासाठी रक्कम उपलब्ध करून दिल्याप्रमाणे दि.१३ड१२ड२०२४ ते दि.०४ड०१ड२०५२५ या कालावधीत गाळप झालेल्या ११९१९६ मे.टन ऊसाचे पहिल्या हप्त्याची रक्कम तुर्त प्रति टन २४०० रू.प्रमाणे ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग केली असुन, उर्वरित राहिलेली रक्कम ही निधी उपलब्धतेनुसार लवकरच संबंधित ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग करण्याचे कारखाना व्यवस्थानाचे नियोजित असल्याचे कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी नमूद करून कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके आणि सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने सातत्याने जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यामुळे ऊस उत्पादकांनी कोणतीही शंका न बाळगता उद्दीष्ट पुर्तीसाठी आपला ऊस याच कारखान्यास गाळपास देऊन सहकार्य करावे.असे आवाहन ही चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी केले.

कुंडलवाडीच्या दोन पोलिस अधिकाऱ्यांवर लाच लुचपतची कारवाई

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २३ जानेवारी

वाळु वाहतुक करणाऱ्या हायवा वाहन मालकावर कारवाई न करण्यासाठी १७ हजार रुपये लाच घेणाऱ्या कुंडलवाडी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व पोलीस उप निरीक्षक नारायण शिंदे यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधच्या पथकाने कारवाई केली आहे.

तक्रारदार यांच्याकडे एक हायवा वाहन असुन परवानगी असलेल्या वाळुच्या ठेक्यावरून ते वाळु वाहतुक करतात. वाळुची वाहतुक कुंडलवाडी

पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन होत असल्याने पोलीस उपनिरीक्षीक नारायण मारोतराव शिंदे यांनी तक्रारदाराकडे स्वतःसाठी १० हजार रुपये व सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत तुकाराम नागरगोजे यांच्यासाठी १५ हजार रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्या नंतर या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. यात नारायण शिंदे यांनी स्वतः साठी ७ हजार रुपये तर सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांच्यासाठी १० हजार रुपये घेण्याचे मान्य केले. यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नारायण शिंदे यांना १७ हजार रुपये लाच घेताना रंगे हात पकडले या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याच प्रक्रिया सुरू होती.

हि सापळा कारवाई पोलीस निरीक्षक प्रिती जाधव, पोलीस अंमलदार राजेश राठोड, बालाजी मेकाले, ईश्वर जाधव यांच्या पथकाने केली.

माहूर येथील निराधारांचा मेळाव्यास प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. २३ जानेवारी

कृषी उत्पन्न बाजार समिती,माहूर येथील शेतकरी निवास मैदानामध्ये दि.२१ रोजी निराधारांचा भव्य मेळावा घेण्यात आला.सीटूच्या जिल्हा उपाध्यक्षा कॉ.शिलाताई ठाकुर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास अखिल भारतीय किसान सभेचे नेते तथा माकप जिल्हा सचिव कॉ. शंकर सिडाम आणि माहूर तालुका सचिव कॉ.किशोर पवार यांनी संबोधित केले.

शहरासह तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित होत्या.यावेळी निराधारांच्या विविध समस्यांवर सामूहिक चर्चा करण्यात आली.यावेळी महिलांनी आपल्या अनेक समस्या येथे मांडल्या. संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी

वृद्धापकाळ योजना, दिव्यांगा साठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, निराधारांचे मागील थकीत मानधन आदी प्रमुख ज्वलंत विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लाडक्या बहिणींचे थकीत मानधन महिन्याच्या ७ तारखेच्या आत देण्यात यावे या मागणीवर देखील जोर देण्यात आला. तसेच लाडक्या बहिणीचे मानधनात वाढ करून द्यावे आणि निराधारांचे दरमहा ५ हजार रुपये मानधन करण्यात यावे ही मागणी देखील या मेळाव्यातून पुढे आली आहे.

यावरून प्रशासनाने निराधार पीडितांचा अंत पाहू नये व वेळेवर मानधन वाटप करण्यात यावे. ह्या मागण्यासाठी लवकरच माहूर तहसील आणि जिल्हा कचेरीवर धडक देण्याचा निर्णय या मेळाव्यात घेण्यात आला. शेतकरी नेते कॉ.शंकर सिडाम या मेळाव्यास संबोधित करतांना म्हणाले की, पीडित निराधार, दिव्यांग व कष्टकरी गोरगरीब लोकांना न्याय देण्यास सत्ताधारी सरकार पूर्णता अपयशी ठरले असून,लवकरच मोठ्या ताकदीने सरकारच्या विरोधात मोर्चा काढून सर्वांच्या मागण्या शासनाकडे करण्यात येतील आणि जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत हा लढा थांबणार नाही असा निर्धार व्यक्त केला.

यावेळी कॉ.किशोर पवार यांनी देखील राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका करताना ,पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने जनतेला दिलेल्या जाहीरनाम्यानुसार सरकारने गरीब मायबाप जनतेला दिलासा द्यावा. अन्यथा लाल बावटा तीव्र संघर्ष केल्या शिवाय थांबणार नाही.असा इशारा दिला. सीटू कामगार संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षा कॉ.शिलाताई ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त केरताना, सांगितले कि, जोपर्यंत निराधार बंधू भगिनींचे प्रश्न सुटणार नाहीत तोपर्यंत सीटू व माकप शांत बसणार नाही.असा ठणठणीत इशारा प्रशासनास त्यांनी दिला. तर,कॉ.किशोर पवार यांनी निराधारांचा यल्गार कॉम्रेड लोकांच्या साथीने लढण्याचा एकमुखाने संकल्प करत त्यासाठी लवकरच पुढील दिशा निश्चित करून व्यापक लढा उभारण्याचा निर्धार या यल्गार मेळाव्यातून व्यक्त केला.

संक्षिप्त वृत्त

प्रजासत्ताक दिनानिमित्त संजय घोगरे यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

नवीन नांदेड-प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर युवाशक्ती मित्र

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वतीने हाडको येथील शिवाजी चौक येथे घेण्याचे आयोजिले आहे.हडको येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हाडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजन युवाशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबिरास सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रक्तदात्यांना रक्तदान करता येणार आहे. रक्तदान शिबिराचे आयोजक संजय पाटील घोगरे हे सतत १८ वर्षापासून रक्तदान शिबिराचे आयोजन करत असतात या रक्तदान संकलनातून एखाद्या गरीब रुग्णाचा प्राण वाचवता आला पाहिजे अशी निस्वार्थी भावना समोर ठेवून हे उपक्रम सतत राबवत असतात. तेव्हा सिडको हाडको परिसरातील रक्तदात्यांनी या भव्य रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आव्हान रक्तदान शिबिराचे आयोजक संजय पाटील घोगरे आणि मित्र मंडळ यांनी केले आहे.

बाऱ्हाळीत स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती

बाऱ्हाळी-उद्धव बाळासाहेब ठाकरे जनसंपर्क कार्यालय बाऱ्हाळी ता. मुखेड येथे गुरुवार दि. २३ हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांची ९९ वी जयंती साजरी करण्यात आली. उबाटा शिवसेना शाखा बाऱ्हाळीचे गटप्रमुख अंतेश्वर हणमंतराव कोलेवाड यांच्या जनसंपर्क कार्यालयात महाराष्ट्र शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी तथा व्यंगचित्रकार स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून जयंती साजरी करण्यात आली. बाऱ्हाळी गटप्रमुख अंतेश्वर कोलेवाड, निवळीचे सरपंच शिवसंबआप्पा मठपती, उपसरपंच संभाजी माळेगावे, पत्रकार दत्तात्रय तिपणे, विजयी मंगलगे, बाऱ्हाळी पोलीस चौकीचे बिटप्रमुख बब्रुवान लुंगारे, आदींनी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी व्यंकटराव बिरादार, अभिजीत नागेश्वर, पंढरी वाघमारे, ताजुद्दीन शेख, गजानन कोलेवाड, अक्षय कोलेवाड, संदीप वाडीकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

सहाय्यक आयुक्त सादिक यांची चौकशी करण्याची मागणी

नांदेड-महापालिकेतील स्वच्छता सहाय्यक आयुक्त यांची पदोन्नती झाली असून या पदोन्नतीची चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गौतम जैन यांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्ताकडे केली आहे. स्वच्छता सहाय्यक आयुक्त सादिक हे अनुकंपा भरती माध्यमातून वर्ग चारच्या पदावर रुजू झाले होते. त्यातच त्यांना सन २००३ पूर्वीचे ४ पत्य आहेत. सिडको येथे क्षेत्रीय अधिकारी म्हणून काम करताना त्यांनी केलेल्या भाष्यमुळे दंगल सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांची पदोन्नती कोणत्या निकषावर करण्यात आली याची चौकशी करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते गौतम जैन यांनी दिला आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

मुखेड-शिवसेना पक्षप्रमुख हिंदू हृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त मुखेड शहरातील मुख्य रस्त्यावर महाविकास आघाडीच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवसेना पक्षप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुष्पपुजन करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव डॉ. श्रावण रॅपणवाड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आबु नाईक, शहर काँग्रेस अध्यक्ष हणमंत नारनाळीकर, शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख जैनोदीन पटेल रावणगावकर, शिवसेना शहरप्रमुख शंकर चिंतमवाड, शिवासेना संघटक योगेश मामिलवाड, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले, युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्ष एम.आर.गोपनर, मागासवर्गिय विभाग काँग्रेस शहराध्यक्ष बालाजी साबणे, अल्पसंख्याक सेल काँग्रेस शहराध्यक्ष ईमराण पठाण, युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीस सुरेश बेळीकर, शिवसेना नेते शरदजी कोडगिरे, काँग्रेस शहर उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, बडे हाफीसाब, युवा नेते सय्यद गौस सलगरकर, शहर काँग्रेस उपाध्यक्ष बालाजी वाडेकर, मिर्झा बेग, शंकरराव पिटलेवाड, गजानन पाटील मोरे, पत्रकार सुशिल पत्की, युवा नेतृत्व पठाण इरफानभाई मोमिन, प्रेस फोटोग्राफर हाफीज पठाण यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नंदू दाढेल, निलेश चव्हाण यांचा सत्कार

लोहा- नगरविकास विभाग,विभागीय क्रीडा स्पर्धेत नगर परिषदेचे लिपीक निलेश माधवराव चव्हाण यांनी ४०० मिटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सूवर्ण पदकाचे मानकरी ठरले. तर नंदू दाढेल यांनी कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सूवर्ण पदक जिंकले. त्याबद्दल लोहा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दोघा सुवर्ण पदक विजेत्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. कर्मचारी संघाकडून सत्कार करण्यात आला. यावेळी ऊल्हास राठोड, सुहास गायकवाड, गंगाधर दळवे, अविनाश महाबळे, गजानन दांगटे, शंकर वाघमारे, चांदु राजकौर, हरी धुतमल, नागोराव मोरे, सतीश गालफाडे, नरेंद्र गायकवाड आदीसह कर्मचारी उपस्थित होते

काँग्रेसचे निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात शनिवारी आंदोलन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २३ जानेवारी

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून शनिवार (ता.२५) रोजी राज्यभरासह नांदेड येथे देखील काँग्रेस कडून निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारा विरोधात निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. खा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन दुपारी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर भाष्य करण्यात येणार आहे. अशी माहिती उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था असून भारतीय राज्यघटनेने स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूका घेण्यासाठी या संस्थेची स्थापना केली. परंतु मागील काही वर्षातील निवडणूक आयोगाची भूमिका पक्षपाती दिसत आहे. २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस आसून या दिनाचे औचित्य साधून राज्यभर काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. दरम्यान २५ जानेवारी रोजी नांदेड जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराचा निषेध करण्यात येणार आहे. खा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्या नंतर काँग्रेस कार्यालय नवा मोंढा येथे दुपारी अडीच वाजता पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर भाष्य करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने पक्षपातीपणा न करता निष्पक्ष व पारदर्शक निवडणूका घेण्याचे कर्तव्य पार पाडावे तसेच लोकशाहीचे रक्षण व मतदारांचा आदर, सन्मान तसेच विश्वास कायम ठेवून विश्वासार्हता अबाधित राहिल याकडे निवडणूक आयोगाने लक्ष द्यावे अशी काँग्रेसची भूमिका आहे. अशी माहिती उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे नांदेड विमानतळावर आगमन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २३ जानेवारी

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे आज श्री. गुरुगोविंद सिंघजी नांदेड विमानतळावर १०.४५ ला आगमन झाले. लगेच ते ११ वा. परभणीला नियोजित दौऱ्यावर रवाना झाले. २३ जानेवारीला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे दीक्षांत समारंभ होत आहे. त्यासाठी ते नांदेड विमानतळावर आले होते. दु. ३ वा. ते मुंबईला परत प्रयाण करणार आहेत. विमानतळावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, डॉ. संतुक हंबर्डे उपस्थित होते.

तालुका पत्रकार संघाने वृत्तपत्र विक्रेते मनोहर मोरे यांना दिला मायेतून मदतीचा आधार

तभा वृत्तसेवा
नायगांव,दि. २३ जानेवारी

तालुक्यातील किनाळा येथील रहिवासी असलेले व शंकरनगर येथील वृत्तपत्र विक्रेते तथा'दैनिक प्रजावाणी'चे प्रतिनिधी मनोहर मोरे उच्च सुशिक्षित असुन नौकरी मिळत नसल्यामुळे नैराश्य न बाळगता. मोटार सायकलच्या साह्याने मागील अनेक वर्षापासून शंकर नगर येथे वृत्तपत्र विक्री करीत.सन्मानाने आपल्या कुंटुंबाचा प्रपंच चालवित होते. परंतू मागील काही महिन्या पुर्वी शंकर नगर येथून मोटार सायकल चोरीला गेली असुन रामतिर्थ पोलीसठाण्यात रीतसर तक्रार केली. रामतिर्थ पोलीसांना मोटार सायकल चोरीचा छडा लावण्यात आज पावेतो यश आलेले नसल्यामुळे मनोहर मोरे वर अनेक समस्याचा सामना करण्याची वेळ आली असून. ही माहिती नायगांव तालुका मराठी पत्रकार संघाच्या लक्षात येताच क्षणी आपणच आपल्या कुंटूंबाला

मदतीचा आधार होवू या ह्या संकल्पनेतून नायगांव तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने. दि. २२ जानेवार रोजी शंकरनगर येथे मराठी पत्रकारसंघाचे माजी जिल्हा अध्यक्ष गोवर्धन बियाणी, माजी जिल्हाअध्यक्ष सुर्यकांत सोनखेडकर, प्रभाकर लखपत्रेवारसह जिल्हाध्यक्ष तथा दैनिक सत्य प्रभाचे उपसंपादक संतोष पांडागळे, रविंद्र संगनवार या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते मनोहर मोरे यांना एक होंडा कंपनीची मोटार सायकल देऊन सन्मान केला आहे.

या वेळी नायगांव तालुक्यातील माजी तालुकाध्यक्ष सय्यद जाफर, तालुकाध्यक्ष लक्ष्मण बर्गे, उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड, शेषेराव कंधारे, दिलीप वाघमारे, आनंदा डाकोरे, अंकुश देगांवकर, प्रकाश महिपाळे, गणेश कंदूर्के प्रो. मानेसह, नायगांव तालुक्यातील मराठी पत्रकार संघाचे अनेक पत्रकार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लेंडी प्रकल्पासाठी २१८ कोटींचा वाटा देण्यास तेलंगणा सरकार सकारात्मक

■ खा. रवींद्र चव्हाण यांनी घेतली हैदराबाद मंत्रालयात बैठक

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २३ जानेवारी

सिंचन क्षेत्रासाठी अत्यंत लाभदायी ठरणाऱ्या परंतु निधी अभावी मागील अकरा वर्षांपासून रखडलेल्या मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी खासदार रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून हैदराबाद मंत्रालयात झालेल्या यशस्वी चर्चेत तेलंगणा सरकारने त्यांचा उर्वरित २१८ कोटी रुपयांचा हिस्सा देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मुखेड तालुक्यातील सुमारे अकरा गावे बुडीत क्षेत्रात गेलेल्या महत्त्वाकांक्षी लेंडी प्रकल्पाचे काम निधी अभावी रखडले आहे तेलंगणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांच्या संयुक्त खर्चातून हा प्रकल्प उभारला जात आहे. दोन्ही

सरकारमध्ये झालेल्या करारानुसार तेलंगणा सरकारकडे असलेला २१८ कोटी रुपयांचा वाटा अद्याप न मिळाल्याने प्रकल्पाचे काम रखडले आहे. हा निधी त्वरित मिळावा यासाठी खासदार रविंद्र चव्हाण यांनी थेट हैदराबाद मंत्रालय गाठले . गुरुवार दि.२३ जानेवारी रोजी तेलंगणाचे पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास मंत्री उत्तमकुमार रेड्डी यांच्या सोबत तेलंगणा मंत्रालय, हैदराबाद येथे झालेल्या महत्वाच्या बैठकीत खासदार रविंद्र चव्हाण यांनी तेलंगणा सरकारकडे प्रलंबित असलेला २१८ कोटी रुपयांचा हिस्सा त्वरित उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव ठेवला. यावर दोन्ही बाजूंनी सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस सचिव पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास विभाग प्रशांत पाटील पानपट्टे , माजी आमदार हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्याम दरक, लेंडी प्रकल्प संघर्ष समिती अध्यक्ष राजू पाटील, सुरेश पंदिलवार, वाकडे, सुभाष बोधने आप्पा, आप्पा, दिनेश आवडके आप्पा, संदीप पाटील, दत्ता येवते आदींची उपस्थिती होती .तर जलसंपदा विभागाच्या वतीने उपविभागीय अभियंता लेंडी प्रकल्प विभाग देगलूर लक्ष्मीकांत जाधव यांनी बाजू मांडली.

दुसरी बैठक लवकरच

लेंडी प्रकल्पासंदर्भात खासदार रविंद्र चव्हाण यांनी तेलंगणातील उपमुख्यमंत्री बट्टी विक्रमा यांचीही भेट घेतली हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. खासदार रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत तेलंगणातील बुडीत क्षेत्र भागांच्या आमदारांची लवकरच बैठक घेऊन निर्णायक तोडगा काढू असे आश्वासन यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

उमरी येथे आ. राजेश पवार यांचा जनता दरबार

तभा वृत्तसेवा
उमरी,दि. २३ जानेवारी

नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार हे उमरी तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आडीअडचणी जाणुन घेण्यासाठी उद्या दि. २४ जानेवारी रोजी उमरी येथील नवीन तहसील सभागृह तहसील कार्यालय येथे दुपारी बारा ते तीन या वेळेत जनता दरबार घेणार आहेत.

आ. राजेश पवार व त्यांच्यासह तालुक्यातील सर्व विभागाचे आधिकारी हे जनता दरबार उपस्थित राहाणार असुन आ. राजेश पवार यांच्या उपस्थितीत ऑन द स्पॉट तक्रारी समस्याचा निपटारा होणार आहे. या अगोदरच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात उमरी तालुक्यात कोटयावधी रुपायची विकास कामे आ. राजेश पवार यांनी केले असुन पुन्हा दुसऱ्यादा नव्या जोमात शुक्रवारी जनता दरबार भरणार असुन जनता दरबारात उमरी पंचायत समीती घरकुल 'आठ अ' उतारा तहसील कार्यालय फेरफार, पादंण रस्ते, स्मशानभूमी, कृषी कार्यालय, यु. पी. पी, पाणी पुरवठा, मनेरगा आदी कामाबाबत शेतकरी गोरगरीब सामान्य नागरिक यांच्या काहीही अडचणी असल्यास जनता दरबारात उपस्थित राहुन समस्या मांडाव्यात असे आवाहन उमरी तालुक्यातील जनतेला आमदार राजेश पवार यांच्या कडून करण्यात आले आहे.

भोकर मध्ये सूर्यास्तानंतर रेतीची चोरटी वाहतूक; महसूल पथक नावालाच

तभा वृत्तसेवा
भोकर,दि. २३ जानेवारी

तालुक्यासह परिसरात मागील आनेक दिवसांपासून रात्रीच्या गर्द अंधारात अवैध रेती तस्करीचा खेळ जोमात सूरु असून सर्वसामान्य नागरिकांना संबंधित अधिकारी व रेती तस्कर जुमानत नसल्यामुळे जिल्ह्याचे वरीष्ठ अधिकाऱ्यांनाच यावर कार्यवाही करण्याची नितांत गरज बनली आहे.

नांदेड जिल्ह्यातील कुठल्याही रेती घाटावर सध्या रेती उत्खनन व वाहतुकीला परवानगी नसताना भोकर तालुक्यात रेती येतेच कशी असा प्रश्न उपस्थीत होत आहे.रेती तस्करांना महसूल प्रशासनाचा आशिर्वाद लाभल्यामुळेच की काय? विना नंबर प्लेट हायवा,तसेच नंबर खोडून काढलेल्या वाहनातून शेकडो ब्रास वाळूची तस्करी करत आहेत यातून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. या व्यवसातून स्थानीक महसूल विभाग यंत्रणेतील सबंधित आधिकारी हे माञ मालामाल होत असल्याचे दिसून येते भोकर फाटा ते बारड आमदरी ,नारवाट,उमरी, मुदखेड रोड मार्गे शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक होत आहे. विशेष म्हणजे,वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्पर व ट्रॅक्टरांचे नंबर प्लेट काढून टाकण्यात आलेले आहेत असे का केले जाते हे अनुत्तरीत आहे. परिवहन विभागाला व वाहन पोलीस प्रशासनास माहिती असूनही कार्यवाही होत नाही हे आश्चर्यच! अवैध वाळू तस्करांवर कूणाचेही नियंत्रण राहिले नाही.जागरुक नागरीकांनी रेतीची गाडी थांबवून

महसुल विभागास कळविल्या उपरही कार्यवाहीसाठी तहसिलदार, नायब तहसिलदार अथवा कोणी जबाबदार कर्मचारी कार्यवाहीसाठी येत नाहीत. येथे महसुलचे भरारी पथक नावालाच नेमण्यात आले आहे का?असा प्रश्न निर्माण होत आहे.हे भरारी पथक रात्रभर कुठे कर्तव्य बजावतो हे त्यांनाच माहीत! महसूलच्या भरारी पथकातील एकाही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे भ्रमण ध्वनी क्रमांक व वेळापत्रक सार्वजनिक करण्यात आले नाहीत.सूर्यास्तानंतर सूर्यो दयापर्यंत गोण खनिज उत्खनन व चोरटी रेती वाहतूक यास पूर्णतः बंदी असताना भोकर च्या महसूल प्रशासनातले अधिकारी मात्र अशा अवैद्य रेती तस्करावर कारवाई करण्यास टाळाटाळ करित असल्याचे निदर्शनास येते.

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुक इतर अवैद्य धंद्यावर अंकुश आणण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार ऑपरेशन फ्लॅश आउट या अंतर्गत यांनी वेगवेगळे भरारी पथके नेमून वाळू तस्करीसह विविध अवैध धंद्यावर अंकुश आणण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्याल पोलीस ठाण्यास देण्यात आल्या आहेत मात्र वरिष्ठांच्या आदेशांना बगल देत भोकर महसूल प्रशासन झोपेचं सोंग घेत रेती तस्करांना रान मोकळे करुन दिल्याची चर्चा असून अवैध रेती वाहतुकीमुळे प्रशासनाचे महसूल तर बुडत आहेच ओव्हरलोड गाड्यांमुळे रस्ते खराब होत आहेत. अनेक अपघात होत आहेत यासह पर्यावरणाचे नुकसान होत आहे. महसूल विभागाने रात्रीसाठी पथके नेमली असताना देखील शहरात व तालुक्यात अवैद्य रेतीची वाहतूक होतेच कशी असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.तालुक्यासह परिसरात होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.